REGISERED N. No. 4

सहामाही „ ३ „

साल अखेर „ ७ „ १ ८९

किरकोळ अंकास ....................... ८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस ........ ८१ ०१

दुसरे खेपेस .... .... ....८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as

Six monthly......... 3 ............... 8 as

Single copy ................................ 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line.„8 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXV AKOLA MONDAY 4 NOVEMBER 1901 NO 43

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख ४ माहे नोवेंबर सन १९०१ इ० अंक ४३


कि० दिवाणी दावा नंबर ९ क्लास १९

१९०१

कोणीं स्थानापन्न होते तेव्हां त्यानला कर्ज वसूल करण्याबद्दल सरटिफीकीट देण्याचा कायदा अक्ट् नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वये नोटीस.

विद्यमान दांडेकर साहेब बहादूर सिव्हील जड्ज अकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार वालंबी मर्द बापूजी वस्ती हातोलें तालुका अकोला.

सर्वत्र लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदारानें मयत बापुजी वल्लद भवानी हातोलेकर याचे लोकाकडेस येणें असलेलें कर्ज रुपये १९६४७ हें कर्ज वसूल करण्याकरितां सरटिफीकिट मिळावें ह्मणून तारीख १८ माहे आक्टोबर सन १९०१ इसवी रोजी अर्ज केला आहे व त्या अर्जाचे चौकशीची तारीख १६ माहे नोवेंबर सन १९०१ इसवी रोजीं मुकर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्ताऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार यानला कां सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें माझे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे.

आज ता० २९ माहे १० सन १९०१

V. N. Dandekar.

सिव्हिल जड्ज.

अकोला.

---

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ९ शके १८२३

---

संस्थानची दिवाणगिरी ही बड्या हुद्देदारीची, मोठ्या अधिकाराची आणि फार जोखमीची आहे. अशा प्रधान स्थानीं मोठा चतुर, बुद्धिवान् व गुणी पुरुष असावा लागतो. तो निस्पृही, कार्यदक्ष आणि निरलस असा असला पाहिजे. लालचीची, आपस्वार्थाची किंवा दुष्टपणाची त्याची बुद्धि नसावी. दिवाण हा राजाचा उजवा कर्ता हात आहे व तो सर्व राज्याचा आधारस्तंभ होय. राज्याचा भावी उदय काल, त्याची भरभराट व सुखसंपदा हीं त्याच्या एकट्याच्या कर्तृत्वशक्तीवर अवलंबून असतात. तो [illegible] व चांगला विद्वान असला [illegible] या प्रजेला विद्याव्यासंगाची [illegible] ल व मोठमोठ्या पंडित, [illegible] न रत्नांचा तो आपल्या दरबारीं सुसंग्रह करील. तो आपल्या गोड व मोहक वक्तृत्वानें आणि विनयसंपन्न वर्तनानें सर्व प्रजाजनांचा आपल्या ठायीं दृढ विश्वास उत्पन्न करील, त्यांचा जीव आणि प्रीति आपल्याकडे ओढून घेईल, आणि सर्वांचा प्रेमभाव व ऐक्यभव वृद्धिंगत करील. तसेच तो मुत्सद्दी वीर असला तर आपल्या राज्याचा विस्तार वाढवील, शत्रूंचा समाचार घेईल आणि आपली तरवार गाजवील. असला श्रेष्ठ पदारूढ असलेला पुरुष आपल्या उदात्त कल्पना व विचार यांनीं एक उत्तम वळण सर्वांस लावून देईल आणि हा धडा सर्वमान्य ठरेल. असा सर्वगुणमंडित कार्यकुशल, व चतुरस्त्र मंत्री ज्या राज्यास लाभला त्याच्या सुदैवाची व पुण्याईची थोरवी काय वर्णन करावी!

अशा थोर पुरुषांच्या खाणी सांपडत नाहींत. असे गुणी जन बोटावर मोजतां येतील इतके दोन चारच असतात. तरी त्यांतल्या त्यांत आवड निवड करून कोणास तरी प्रधानकीचीं वस्त्रें द्यावीं लागतात. हें काम अति बिकट आहे. अशा उच्च पदवीवर कोणचा मनुष्य येतो हें समजण्याची सर्व लोकांस फार जिज्ञासा व उत्कंठा असते. कारण सर्व भावी आशांचा मनोरम मनोरा या पायावर उभारावयाचा असतो. पुढील सुखदुःखाचा चित्रपट ह्या पुरुषश्रेष्ठाच्या गुणरूप रंगांनीं रंगविला जातो. अशा प्रसंगीं सर्वांची तंद्री त्या भावी नायकाच्या भूमिकेवर लागावी हें सहाजिक आहे. आपल्या व्हाईसराय साहेबांची जेव्हां निवड होत असते तेव्हां चोहोंकडे बहुविध आशा व निराशा यांचे तरंग वातावरणांत उठत असतात. पण एखाद्या संस्थानात नवीन दिवाणाच्या संस्थापनेचे वेळीं आनंद किंवा दुःख यांची जी गडगड होते तशी गडबड कित्येक लाट गव्हरनर जुने गेले व नवीन आले तरी होत नाहीं. संस्थानांत सर्व उच्चनीच दर्जाच्या लोकांना आपलेपणा ह्मणून जो कांहीं वाटतो तसा आत्मवत्भाव ह्या इंग्रज प्रभूच्या प्रधाना संबंधीं वाटत नाहीं. मराठी रहाशतींत आपल्या राजाचें वैभव पहाण्याचे व त्याचा सुख सोहळा उपभोगण्याचे वारंवार प्रसंग येतात. इंग्रजशाहींत अशा गोष्टी नाहींत हीच गोष्ट इंग्रज व मराठी शाहींच्या मधील महदंतर दाखविते.

आपलीं संस्थानें हीं आपल्या लोकांच्या बुद्धिमत्तेची व करामतीची कसोटी होत. हीं ठिकाणें आपल्या अंगांतील दबून राहिलेलें पाणी व पराक्रम यांच्या साठीं राखून ठेविलेलीं विहार मंदिरें होत. या सुरम्य क्रीडा स्थानाच्या पटांगणांमध्यें उभे राहून अनंत व अजब अशा क्रीडा आपल्या लोकांनीं करून दाखविल्या आहेत. व त्या पाहून मी मी ह्मणविणाऱ्या पट्टीच्या लोकांनीं तोंडांत बोटें घातलीं आहेत. सर टी माधवराव, राजे दिनकरराव, किंवा सर सालरजंग हे अगदीं अलीकडे होऊन गेलेले खेळगडी होत. यांनीं जीं मोठमोठीं करामतीचीं कामें केलीं तशीं आतांच्या लोकांकडून वठतील किंवा नाहीं याची वानवा आहे. तो काळही लोटला व ते प्रसंगही संपले, तशी स्थिती आतां राहिली नाहीं. हल्लींचा राज्य कारभाराचा मार्ग बराच सरळ व सोपा झालेला आहे. कारण राज्यकर्तृत्वाची जबाबदारी विशेषशी नसते. स्वतंत्रपणें मनसोक्त क्रियाकर्में आपणांस करतां येत नाहींत. पण ठराविक मंत्रतंत्रानीं सर्व कार्यभाग उरकतो. तरी सुद्धां कांहीं अलौकिक प्रकाशज्योती आपल्यांत पेटली असेल तर तिचा प्रकाश इतरांना येथें देतां येईल. ही जोगी संधी ज्यांना प्राप्त झाली आहे त्यांनीं उत्तम करणी करून सर्वांचे कोट कल्याण करावें ह्मणजे मग सर्व लोक त्यांचें गुणगीत गातील.

ह्या वर्षांत हैदराबाद, ह्मैसूर व बडोदे या दरबारीं नवीन दिवाण बहादूर अवतीर्ण झाले आहेत. ते आपल्या गुणांनीं लोकांस फार प्रिय होतील अशी आशा आहे. ज्यांच्या कर्तबगारी बद्दल लोकांस शंका असेल त्यांनीं डोळ्यांत तेल घालून आपला कारभार चांगला झाला असा नाणवून सोडण्यास विशेष झटलें पाहिजे. व लोकांच्या गैर समजास जी जागा मिळाली आहे ती नाहींशी केली पाहिजे. आपल्या राजाची मर्जी, इंग्रजी प्रभूंच्या प्रतिनिधींची मर्जी व प्रजाजनांची मर्जी या त्रयमूर्ती जेणें करून सुप्रसन्न राहतील तें कर्तव्य बजावण्याची काळजी ठेवावी ह्मणजे त्यांची दिवाणगिरी यशस्वी व चिरस्मरणीय राहील. घोडा मैदान दूर नाहीं व लवकरच कोण जिंकतो हें दृष्टोत्पत्तीस येईल.

---

## कविवर्य मोरोपंत

( या विषयावर अकोला लायब्ररींत मि. काळेले यांनीं ता. ६ आक्टोबर रोजीं व्याख्यान दिलें त्यावर रा. रा. वि. आ. काणे यांनीं अध्यक्ष या नात्यानें भाषण केलें तें )

आजच्या व्याख्यानाचा विषय फारच महत्वाचा आहे, यांत संशय नाहीं. कवीची योग्यता, त्याच्या ग्रंथांचा विस्तार, आणि त्याच्या कडे आज विद्वानाचें लक्ष वेधून गेलें आहे तें, ह्या गोष्टी मनांत आणिल्या, ह्मणजे असें वाटतें कीं, या बाबतींत कोणी कितीही विवेचन करीत राहिला तरी तें कधीं संपायाचेंच नाहीं. आतां दुसऱ्या पक्षीं पाहिलें तर व्याख्यानकार मि. काळेले यांनीं या विषयाचें थोडक्यांत मुद्देसूद विवेचन केलें आहे. यास्तव त्या संबंधात आणखी कांहीं सांगावयाचें प्रयोजन राहिलें नाहीं. मि. काळेले यांनीं या विषयाचीं सर्व अंगें यथार्थ रीतीनें आपणा समोर मांडिलीं आहेत. कवीच्या लोकोत्तर बुद्धिमत्तेची, अतुल विद्वत्तेची, त्याच्या विशाल कल्पनांची व अप्रतिम व्यवहारचातुर्याची त्यांनीं उत्तम प्रकारें परिस्फुटता केली आहे. त्याच्या काव्यांत प्रसाद, प्रसन्नता इ० गुण कसे वसत आहेत व त्यामुळें काव्य आल्हादजनक कसें झालें आहे, तें मोठ्या मार्मिकतेनें दाखविलें आहे. याच्या काव्यांत शतशः शब्दालंकार असून तेच अर्थालंकार कसे झाले आहेत तेंही दाखविलें आहे. सामान्यपक्षीं पाहिलें तर शब्दालंकार व अर्थालंकार यांचें फारसें सख्य असण्याचा संभव नाहीं. इतकेंच नव्हे. परंतु बहुधा ते परस्पर विरोधी असतात. अशी वास्तविक स्थिति असतां. या कवीच्या मध्यस्थीनें, परस्परांतील वैरभाव विसरून कवीनें नेमून दिलेलें काम, हातांत हात घालून, मोठ्या हौसेनें ते कसें बजावीत आहेत तें आपणांस दिसत आहे. सामान्य कवींस धोका बसण्याचें हेंच स्थळ होय. शब्द चमत्कारांनीं वाचकांचें मन आकर्षिलें गेल्यामुळें तें पद्य तो आवडीनें वाचतो आणि मग अर्थाकडे पाहूं लागतो तर मधुर फळाच्या साली मात्र हातांत पडतात. आंतील रुचिकर भाग त्यास मिळत नाहीं. प्रस्तुत कवीचा तसा प्रकार नाहीं. त्याच्या हस्तस्पर्शानें, जाणों, त्या फळास अधिक मधुरता येते. ही एकच गोष्ट प्रस्तुत कवीचें असामान्य योजनाचातुर्य दाखवीत आहे. हे सर्व प्रकार व्याख्यात्यांनीं स्पष्ट करून दाखविले आहेत. तसेंच कवीच्या संबंधानें कोणी आक्षेप काढिले आहेत त्यांचें निरसनही समर्पक रीतीनें केलें आहे. हे पांच आक्षेप असे आहेत कीं, त्यांचें निराकरण त्या आक्षेपांतच आहे. नुसते आक्षेप आपल्या पुढें आले नाहींत. आपलें समाधान घेऊन ते आले आहेत. जाणों, ते ह्मणत आहेत कीं, आह्मांस बळेंच येथें आणिलें. आह्माला परत घालविण्याची तयारी करण्याचें श्रम तुह्मास पडूं नयेत ह्मणून परत जाण्याच्या साहित्या सुद्धां आह्मीं आलों आहों. आह्मांस जाऊं द्या. सारांश प्रश्न रचतांनांच त्यांचीं उत्तरें त्यांत गुंफून टाकिलीं आहेत.

कै. विष्णुशास्त्री चिपळोणकर यांनीं या कवीची एक सारखी तारीफच केली आहे. असें असतां, ज्यांत कांहींच वजनदारी नाहीं, असे आक्षेप, अशा मोठ्या विद्वानानें कसे घेतले अशी शंका येते. तरी इतक्याच गोष्टीवरून विष्णुशास्त्री यांचे ठायीं कांहीं कमीपणा मानावा असें नाहीं. या गोष्टीस आज पंचवीस वर्षें झालीं. या कवी विषयीं जी व जितकी माहिती आज सामान्य वाचकांस उपलब्ध आहे, तितकी पूर्वीं पंडितांसही नव्हती. शिवाय विष्णुशास्त्री बावांचें त्यावेळचें वय पाहिलें ह्मणजे तें अनुभवार्जन करण्याचें होतें असें दिसून येईल. तेव्हां, अशी स्थिति असतां त्यांच्या हातून चांगलें ह्मणून जें कांहीं घडलें तेंच फार होतें असें ह्मटलें पाहिजे.

मि. काळेले यांनीं, या कवीचे काव्यांत कोठें कोठें दोषस्थळें दिसलीं, तींही, निस्पृह व खऱ्या परीक्षकाच्या कर्तव्यास अनुसः

रून, दाखविलीं आहेत. येणें प्रमाणें यांचें व्याख्यान, कोणत्याही बाजूनें पाहिलें तरी, प्रतिपाद्य विषयावर पूर्ण लक्ष देऊन परिश्रमही चांगलेच केले आहेत असें दाखवितें. हें काम अल्प काळांत आणि वरवर अवलोकन करून व्हावयाचें नाहीं. ह्मणून या प्रयत्नांबद्दल त्यांचे आपण आभार मानणें रास्त आहे.

प्रस्तुत कवीच्या मनाच्या थोरपणाबद्दल व त्याच्या काव्यांत जे विशेष (beculiarities) आढळतात त्यांबद्दल व्याख्यात्यांनीं निरूपण केलेंच आहे. त्याच संबंधीं आणखी विचार कळविण्याचें हेंच स्थळ होय ह्मणून तसें करितों.

तत्ववेत्त्यांचे उद्गार सर्व देशांत व सर्व काळांत सारखेच असतात. ते उद्गार काढण्याच्या त्यांच्या तऱ्हा देखील एक सारख्या असतात. आतां परिस्थितीचा विचार केला तर असें दिसतें कीं, लहानापासून थोरापर्यंत, फारच थोरापर्यंत, ह्मटलें तरी चालेल, त्या परिस्थितीच्या दाबाखालीं ते दाबले जातात, व परिस्थितीच्या बंधनांनीं जखडून बांधलेले जातात. निरंतरच्या सहवासामुळें व संवयीमुळें अयोग्य दाबाखालीं आपण दडपलों आहों, किंवा आपणास विनाकारण बंधनें दिलीं आहेत, असें तत्कालीन फार थोरांच्याही मनांतच यावयाचें नाहीं. ते थोर खरे. पण इतर कामांत या बाबतींत त्यांची दृष्टि अखूड झालेली असते. इतकेंहि असून, एकाद्यानें चीरून त्या वर्तुळाचे पलीकडे दृष्टि फेंकिली तर लोकभय, लोकापवाद, शिष्टाचार, शिष्टसांप्रदाय यांचीं तुफानें उठलेलीं भास दिसूं लागतात. त्या झंझा वाताच्या भोंवऱ्यांत आपण सांपडूं नये, ह्मणून तो आपली नौका पुढें न लोटतां किनाऱ्याकडे वळवितो. यांत त्या बिचाऱ्याचा काय दोष ?

तर मग या समुद्रांतून तरून जाणारा कोणी आहे कीं नाहीं ? होय आहे. तो या सर्वांच्या फारच उन्नत वर्गांत असतो. त्याला तत्वज्ञानी ह्मणतात. रामदास, तुकाराम इ० हीं यांचीं उदाहरणें होत. यांना देखील परिस्थिति सुटली होती असें नाहीं. पण संधि मिळतांच यांनीं तिचीं बंधनें तटातट तोडून टाकिलीं, असो. आतां असे विशेष पंतांत कोणते होते ते पाहूं. व्याख्यात्यांनीं ह्मटलेंच आहे कीं, “विधवां विषयीं यांची सहानुभूति फार मोठी होती” आणखी आपल्या पाहण्यांत असें येईल कीं, जेथें जेथें स्त्रीजनांविषयीं उल्लेख करण्याचा प्रसंग आला तेथें तेथें अत्यंत आदराचीं संबोधनें यानें योजिलीं आहेत, व पराकाष्ठेचीं गोड व पुन्हा समर्पक विशेषणें त्यांस लाविलीं आहेत.

असो. ह्या काळांत स्त्रिया ह्मणजे मालमत्ते प्रमाणें समजण्याची चाल होती, किंबहुना कांहीं उदाहरणांत स्त्रीला अस्तित्व आहे कीं नाहीं याचीच शंका होती, आणि अस्तित्व असलेंच तर भूमितींतील बिंदूच्या व्याख्ये प्रमाणें लांबी, रुंदी व उंची या परिमाणांवांचून तें अस्तित्व आहे, असेंच होतें, अशा परिस्थितींत स्वपत्नीचा उल्लेख गौरवानें करणें कमी धैर्याचें लक्षण नव्हे.

एका गृहस्थानें आपला अनुभव मला सांगितला. तो ह्मणाला पंतांचे बरेच ग्रंथ आपण पाहिले. व त्यांचे सर्व श्रेष्ठत्वाविषयीं आपल्या मनांत शंका उरली नाहीं, तसेंच अवांतर विषयक त्यांचीं काव्यें, ज्यांत आप्त सुहृद्, इष्टमित्र, शेजारी पाजारी, शेट सावकार, निरनिराळे धंदेवाले व ज्ञातिवाले, तीर्थें, क्षेत्रें, मोठीं स्थळें, साधुसंत व मुत्सद्दी यांचीं वर्णनें फार सुरेख केलीं आहेत, तींहि आपण वाचिलीं पण कोठेंहि कवीनें स्वपत्नी विषयीं उल्लेख केलेला दिसला नाहीं यावरून पूर्वोक्त लोकसंप्रदायाच्या दाबास वश होऊन कवीनें आपली वृत्ति आंवरून धरिली असें त्यास वाटलें. व कवीच्या पूर्ण शंभर अंशांच्या योग्यतेंत एक तरी अंश कमी असल्यामुळें व तो फार महत्वाचा असल्यामुळें त्याच्या मनास विषाद वाटला. पण एकच आर्या, जींत कवीनें, स्वपत्नी विषयीं उल्लेख केला आहे ती मागाहून त्याच्या दृष्टीस पडली

मी जरि अशक्त निर्धन,
कोणी तरि बहु भली रमा भार्या ॥
ईतें सद्गति दे तूं
हेंचि करीं प्रथम बोध या कार्या ॥

मित्रहो ! एकच आर्या ! पण तींत हृदयस्थ सगळा उदारपणा व प्रेमाचा संचय ओतलेला आहे. प्रख्यात अर्थशास्त्रकार व तत्ववेत्ता जान स्टुअर्ट मिल, यानें ‘ लिबर्टी आफ दी पीपल ’ या संबंधानें, किंवा मि. फासेट यानें आपल्या एकाद्या ग्रंथाच्या संबंधानें, कोणी तें मला बरोबर आठवत नाहीं, [ या श्रोतृसमाजांतील विद्वान गृहस्थ तें सांगूं शकतील ] स्वभार्येविषयीं परम आदराचे जे उद्गार काढले आहेत, त्यांचें साम्य आपल्या कवीच्या उद्गारांशीं तंतोतंत आहे. या आर्येंत प्रथमच स्वतःचा कमीपणा, व आपल्या साध्वी स्त्रीचा श्रेष्ठपणा दाखवून कवि ईश्वराची आराधना करितो, कीं, तिला उत्तम पद दे, आणि शेवटीं ह्मणतो कीं, काव्य करण्याकडे आपली प्रवृत्ति होण्यास आपल्या भार्येचें प्रोत्साहन कारण झालें. थोर मनाचें याहून आणखी थोर लक्षण कसें असतें ?

( पुढें चालेल. )

---

## प्लेगाची भीति

दक्षिण महाराष्ट्रांत प्लेगाचा रोग उत्तरोत्तर वाढत आहे आणि कांहीं कांहीं ठिकाणचीं दुःखद वर्तमानें कळतात तेव्हां अंगावर शहारे उभे राहतात. या रोगा इतका घातुक आजार लोकांच्या आठवणींत पूर्वीं कधींच आला नव्हता. मृत्यूनें आपली दिवाणगिरी या प्लेगाकडेच सोंपविली आहे; आणि तेव्हां पासून मृत्युलोकची कल्पना डोळ्यापुढें तत्काळ उभी राहते. हा रोग खानदेशांतहि वाढला आहे. पाचोऱ्याच्या आसपासचा भाग फार ग्रस्त आहे. वऱ्हाडच्या सरहद्दीवर या रोगाची मजल येऊन ठेली आहे ह्मणून विशेष काळजी वाटण्याला कारणें झालीं आहेत.

या काळजीला विशेष खरेपणा येण्याला या आठवड्यांत नुकतेंच एक उदाहरण घडलें. मुंबईहून एक भाट्यांच्या ज्ञातीचा भिक्षुक आकोल्यास तारीख २४ च्या सुमाराला आला. येथें भिक्षुकी करण्याच्या हेतूनेंच तो आला होता, त्याचें नांव लीलाधर काळा. उतारवयाचा हा माणूस असल्यामुळें त्याला फिरण्यातवरण्याचा मोठा ताप झाला. तीन दिवस दवाखान्यांत जाऊन डाक्टराला हात दाखवीत होता. पण एकदम जो ताप आला तो १०९ अंशावर चढला. तो बेशुद्ध ही झाला. एकदम न्युमानिक तापाची विकृती दिसली. तो निराश्रित होता ह्मणून त्याला दवाखान्यांत नेलें. पुढें तो दुसऱ्या दिवशीं ह्मणजे गेल्या सोमवारीं मरण पावला. हा मृत्यु प्लेगामुळें घडला असावा असा संशय वाटला ह्मणून येथील सिव्हील सर्जन डाक्टर रेली व त्यांचे आसिस्टंट डाक्टर दुर्गया यांनीं पुष्कळ शहानिशा केली आणि कदाचित् असेल तर हा प्लेग असून मुंबईस त्याला जडला असावा असा निर्णय ठरला. हा प्लेगाचाच आजार आहे ह्मणून डाक्टर रेली साहेब सांगत नाहींत तथापि सार्वजनिक आरोग्या साठीं विशेष काळजी व दक्षता घ्यावी ह्मणून त्यांनीं मुद्दाम सूचविलें आहे, मुंबईच्या बाजूनें सरहद्दीवरच बुलढाणें जिल्ह्याचा भाग आहे आणि या भागांत प्लेगाचा शिरकाव होऊं नये ह्मणून प्रतिबंधाचे उपाय मे. रुस्तुमजी साहेब यांनीं जारीनें चालूं केले आहेत आणि अकोला जिल्ह्यांत डाक्टर रेली हे पूर्वीं पासूनच मोठे दक्ष आहेत तेव्हां प्रतिबंधक उपायांत कांहीं कमतरता होणार नाहीं असा पक्का भरंवसा आहे.

या रोगा संबंधानें हा प्रांत फार सुखी आहे. परमेश्वराची या भागावर मोठीच कृपा आहे. जिकडे हा रोग उद्भवला आहे त्या प्रांतापेक्षां इकडील हवापाणी कांहीं निराळें आहे असें नाहीं. तिकडील पुष्कळशा भागापेक्षां या प्रांतीं अस्वच्छता अधीक आढळेल. तथापि ईश्वराच्या कृपेनेंच या रोगापासून या प्रांताचें संरक्षण झालें असें आह्मास पक्कें वाटतें हल्लीं उंदीर सर्व प्रांतभर पुष्कळसे झाले आहेत. उंदिरांची समृद्धी एवढी कधीं पाहण्यांत आली नव्हती उंदीर आणि प्लेग यांचा संबंध कांहीं विचित्र आहे. उंदिरांवर हा रोग प्रथम सुरूं होतो आणि ते लवकरच मृत्युमुखीं पडतात. आणि दुसरी अपायिका अशी आहे कीं, उंदीर हा रोग फार जलदी फैलावतात. तशांत गेल्या सोमवारीं एक मुंबईहून आलेला भाट्या एकाएकी तापानें मरण पावला. या गोष्टींनीं मोठी काळजी उत्पन्न केली होती. आणि प्लेगाच्या भीतीमुळें सरकारी बंदोबस्ताखालीं लोकांस फार त्रास होईल असा रंग होता पण निदान येथील सिव्हील सर्जन साहेबांस फारशा काळजीचें प्रयोजन दिसत नाहीं ही समाधानाची गोष्ट होय. परमेश्वराच्याच प्रसादानें सर्व विघ्नबाधा टळतील आणि या प्रांताच्या सुभाग्यानें हा प्रांत या रोगापासून अगदीं अलिप्त राहील. अशी आह्मांस बळकट आशा आहे.

---

## स्तुत्य देणगी

लेडी डफरीन फंडाच्या वऱ्हाडच्या शाखेला तीन श्रीमान् गृहस्थांनीं पांचपांशे रुपयांची देणगी दिली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. या तीन गृहस्थापैकीं दोघेजण कारंजाचे प्रसिद्ध पुढारी आहेत. रा. रा. प्रयागजी लीलाधर हे एक असून दुसरे रा. रा. लक्ष्मणराव दहिहांडेकर हे आहेत. कारंजाचे रामजीनाईक काणव यांच्या नांवानें यांनीं ही रक्कम दिली आहे. तिसरे गृहस्थ आकोल्या जिल्ह्यांतील प्रमुख देशमुखा पैकीं आहेत. अंदुराचे रा. रा. खुशालराव गणपतराव देशमुख हे आपल्या वडिलांचा नांव लौकिक संभाळून आहेत; आणि त्यांनींच या लेडी डफरीन फंडाला ही पांचशें रुपयांची देणगी दिली आहे. हे होतकरू असून थोडबहुत शिकलेले आहेत. बाळापुरास लाडबाईची इमारत यांनीच आपल्या खर्चानें बांधून दिली. सार्वजनिक कामांत चांगले पुढें असतात. यांनीं आपली शेतीवाडी चांगल्या स्थितीला आणून आपल्या घराण्याचा मोठपणा पुष्कळ वाढविला आहे. हे सरकारी चाकरीवर नाहींत तरी सरकारी अधिकारीही यांस चांगले पहातात. रा. रा. खुशालराव हे सार्वजनिक कामांत असे पुढें येत आहेत हें पहून मोठा आनंद वाटतो. वरील तिन्ही ग्रहस्थ लेडी डफरीन फंडाच्या संस्थेचे हीनहयात सभासद झाले आणि त्यांची देणगी उमरावतीच्या स्त्रियांच्या दवाखान्याकडे खर्चीं पडावी असा त्याचा मूळ हेतुही कबूल करण्यांत आला आहे.

---

## काव्य रत्नावली

हें मासिक पुस्तक जळगांव मेहूला निघत असतें. या मासिक पुस्तकाला हल्लीं १३ वें वर्ष आहे. याचे अंक बरेच मागसलेले होते पण त्याचे प्रकाशक रा. रा. नारायण नरसिंह फडणीस यांनीं गेल्या सहा महिन्यांच्या अंकांची शिल्लक बाकी पुरी करून दिली आहे. आतां फक्त बारव अंक निघण्याचे राहिले आहेत विद्यमान कवींनीं चालविलेलें हें मासिक पुस्तक असून तें लोकाश्रयास चांगलें पात्र आहे. टपाल हांशिलासुद्धां वर्गणी १ रु. ४ आणे आहे. या पुस्तकाला मधंतरीं मंदत्व आलें होतें पण तें आतां दूर होऊन पूर्ववत अभिवृद्धी होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. सुंदर सुंदर त्रोटक काव्याचे चुटके पुष्कळ मनोहर असे प्रस्तुतच्या पांच सहा अंकांतून आहेत पण त्यांचें पृथकरण करण्या इतकें वाचन आमचें पुरें झालेलें नाहीं.

---

## The Berar Samachar

MONDAY NOVEMBER
4 1901

The National Congress meets at Calcutta in December next. From the grand preparations that are on foot we auguer well that this Congress will be as grand and majestic as its predecessors. The previous successes guarantee the success of the next sessions. We wish that this Congress will be a large gathering of representatives from the different portions of the vast empire. The coming Congress is more important than the preceding Congresses for

more reasons than one. The leaders of the Indian community will have to take a resolute and decisive step in regard to the permanent character of the Congress. In addition to the political questions that are being discussed from year to year there will be a different programme in which will be included the problems of the day in regard to the spread of technical education, industrial and commercial training, the material advancement of India and similar important questions. The experiences of the last 16 years are not very promising. Though the Congress is the triumph and glory of the British rule in India it is not however an accredited institution of the Government. The Congress aims at bringing home to the Government the demands of the people in regard to the disabilities which have killed the political independence of the whole population. The political privileges which we claim are the birth—rights of a British subject. We call upon the Government to admit us to a larger sharer in the administration of the country. The people have in fact no vote in the deliberations of the Government on their executive side. The consciousness of a higher political life came to us as a product of the western education and we are being welded into one nationality by the common ties of one political Sovereign and the necessity for united efforts in the elevation of India. We have fought our political war for a long period of half a generation. The cost to the nation has been also a great one. We do not seem to have gained an inch of ground with the Government. The latter do not respond to the call of the people and have turned a deaf ear to all their prayers. This is almost our progress in practical politics. The Congress has been a successful polity of educating and formulating the public opinion in India. The Government are also prepared to consecrate it with the name of a 'liberal opposition' in the Parliament of India. This is all good and fine in theory. But our defeats have taught us a great lesson of self—help. We must seek our ways of improving the material condition of the people. Unless we achieve it we do not hope to secure a footing in the general aims of the Congress. We admit that the people of the middle—classes have made numerous sacrifices for maintaining the Congress. This enormous expenditure of not less than a lac and a half per yaer represents the public spirit and the patriotism of our people. We want to reap a golden harvest of these national movements of the last 16 years, We must stick stead fastly to our programme of the Congress. The new line in the policy of the Congress will be the deliberations about the ways and means of improving the material wealth of the nation. This will be the next question. It will absorb our thoughts and energies and a proper solution of it will make an Indian worth his salt. The cardinal defects in the educational system will occury and arrest the attention of the Congress for the greater portion of its sittings. A radical change in the present system will be the necessity and the way in which we shall move the Government to effect it will speak to our success in the solution of the problem of the day. India is a dead nation if we consider it as an industrial and commercial one. But Indian's whole strength must lie in her own industry and agriculture and unless we win the palm of other competing nations in India in this vital branch of India's resources the day of our salvation will be for off in the distant future. We shall have to make the most of the blessings of the British rule but we must not however forget that we must look to ourselves in securing for India her first place in her industrial development with the help of new scientific inventions. The Congress will alone kindle the light and show us the right path in the future progress of our programme.

---

## वऱ्हाड

हवामान— थंडी चांगली पडते. पीकें साधारण, आहेत उंदीर, टोळ व बोंड याच्या तडाख्यांतून जीं पीकें हातीं येतील तीं खरी रोगराई ह्मणण्या सारखा विशेष नाहीं.

मि० मार्शल एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांची चाकरी ल्यांड रिकार्डाच्या खात्याकडे बदलून दिल्यामुळें त्यांच्या जागीं रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे त्यांस अफिशिएटींग ए० असि० कमिशनर नेमण्यांत आलें अशी आनंदाची बातमी कळते.

तसेंच मि० शेख इस्मायल ए० असि० कमिशनर, यवतमाळ हे वर्षभराच्या रजेवर जाणार असल्या कारणानें त्यांच्या जागीं मि. सैफुद्दीन खान लालखान तहसिलदार आकोला यांस अफिशिएटींग ए० असि० कमिशनरच्या हुद्याची बढती देण्यांत आली. ही नेमणूकही यथायोग्य झाली.

'सुदर्शन' नांवाचें एक साप्ताहिक वर्तमानपत्र रा. रा. नारायण सिताराम रावडी हे तारीख २४ नोव्हेंबर पासून वाशिमास काढणार आहेत. त्यांनीं 'व्यंकटेश वैभव' नांवाचा छापखाना घातला आहे आणि तेथेंच हें वर्तमानपत्र काढण्यांत येणार आहे. पत्राची किंमत सालिना १८९ आणे टपाल हांशिलासह ठेवण्यांत आली आहे.

वाशिमकर संगीत नाटक मंडळी पुण्यास आपल्या गुणांनीं चांगल्या लौकिकाला चढली आहे. या मंडळीचे मुख्य रा० रा० बाळशास्त्री यांनीं डफरिन फंडाला एक हजार रुपये वर्गणी दिल्यामुळें मुंबईच्या गव्हरनरांनीं त्यांस आभारदर्शक पत्र धाडलें आहे.

---

### नोटीस

रेशमी नामदेव वल्द बुलाजी देशमुख आणि किसन वल्द रामराव देशमुख राहणार अडगांव बुजरूक ता. आकोट यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं ता. १ नोवेंबर १९०१ रोजीं रामु वल्द गोविंदा लाहोडे राहणार अडगांव मयत वारस लक्ष्मण वनी मर्द तुकाराम इजकडून परगणे अडगांव येथील शेत सर्व्हे नंबर १०१ पैकीं यांतील निमे शेत हें आह्मी विकत घेतलें आहे. या शेतांतील बटाईच्या मालाचा हक्क आह्मी वरील खरेदीखतांत विकत घेतला आहे. आणि तुह्मी उभयतांनीं तें शेत बनीच्या भावाची बायको नांवें बायजाई इजकडून बटाईनें घेतलें आहे आणि तिनें दुसरा घरठाव केल्यामुळें मयत रामूचा वारसा बनीकडे पोचतो आणि बटाईचा जो माल तुह्मांकडून तिला वारशाच्या नात्यानें घेणें आहे तो सदरील खरेदीखताच्या आधारें आमच्याकडे तुह्मी पोचता करावा आणि तसें करण्यास चुकल्यास रीती प्रमाणें दावा होऊन नोटिशीच्या आणि दाव्याचे खर्चा सुद्धा बटाईच्या मालाची किंमत तुह्मांकडून वसूल करण्यांत येईल कळावें. तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १९०१ इ०

सही

काशिनाथ शंकरआप्पा वाणी अज्ञान पालन करणार जानकाबाई मर्द रामशेट रहाणार अडगांव

निशाणी बांगडी.

---

### नोटीस

सरदारबी मर्द मीर फजलेअली मुसलमान वस्ती अकोला शहर भाजीबाजार यास. खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा मैत नवरा मीर फजलेअली हा माझा सख्खा बंधु होता त्याचे आमचे दरम्यान असलेली इनामजमीन त्यांचे हयातींतच सदर्हू जमिनींत माझा निम्मे हिस्सा असल्या बद्दल त्याणी वाटणीपत्रक करून दिलें आहे, त्या प्रमाणें वाटणी करून देण्यास आपण इनकार करतां ह्मणून तुह्मांस कळविण्यांत येते कीं, आज पासून आठ दिवसाचे आंत वाटणीपत्रका प्रमाणें वाटणी करून द्यावी. तसें न केल्यास आह्मी कोर्टांत फिर्याद करूं त्याचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. त्याच प्रमाणें मैत फजलेअली याच्या जिनगींत वारसाचे नात्यानें माझा $\frac{1}{2}$ हिस्सा आहे. तोही सदर्हू मुदतींत आपण माझा मजला द्यावा. न दिल्यास त्या बद्दलहि फिर्याद करणें भाग पडेल. त्याचाहि खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावे तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १९०१ इ०

सही

तफजुल हुसेन वल्द सय्यद

गुलाम रसूल दस्तुर खुद.

राहणार आकोला.

---

### नोटीस

नोटीस राजश्री गंगाबीसन अर्जुनदास दुकान ताजनापेठ यास खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी आमचे ताजनापेठेंतील जुने चाळी पैकीं दुकान दोन यांत साल दरसालचे भाडेकरी या नात्यानें तुह्मी सालचे साल ठराव करून भाड्यानीं राहणारे कूळ आहांत. संवत १९५७ चे नोटीशी प्रमाणें तुह्मी मकानें खालीं केलीं नाहींत व सदरहू सालचे भाड्याबद्दल रुपये ५८८॥ व नोटीसीचे खर्चाबद्दल आपणाकडून घेणें येणें दिलें नाहीं ह्मणून तारीख ७।१०।१९०१ इ. रोजीं रजिस्टरी नोटीस दिली. आज तारखेपावेतों वाट पाहिली परंतु आपण कांहींच निकाल केला नाहीं करितां पुन्हा नोटीस देणें भाग झालें तर ही नोटीस पावल्या पासून दोन दिवसाचे आंत आमचे दुकानीं येऊन वर लिहिले प्रमाणें नोटीसीचे खर्चासह रुपये देऊन पावती घेणें व आश्विन वद्य ३० रोजीं सायंकाळीं आ-

९७

मचीं मकानें खालीं करून देणें. आह्मी तुह्मास ठेवण्यास इच्छीत नाहीं. वर लिहिले मुदती प्रमाणें रुपये न दिल्यास व मकानें खालीं न केल्यास कार्तिक शुद्ध १ संवत १९५८ पासून मकानें आमचे ताब्यांत येई पावेतों दररोज रुपये २॥ प्रमाणें भाडें नुकसानी दाखल जे होईल तें व वर लिहिले रुपये ५८८॥ व नोटिसीचा खर्च व मकानें खालीं करून घेण्याची व्यवस्था करण्यांत येईल त्याच्या खर्चाबद्दल जबाबदार तुह्मी व्हाल. हें आपणास कळावें. तारीख २८।१०।१९०१ इ०

( सही )

जोरावरमल गंगाधर या नांवच्या

दुकानाचे मालक जानकीदास

गंगाधर साहू दुकान आकोलें

तर्फे जयराम बळवंत

दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

रा. रा. शिवप्रसाद शिवलाल दुकान ताजनापेठ आकोलें. यासः-

खाली सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमचेकडेस आमचे ताजनापेठेंतील जुने चाळी पैकीं मकान १ यांत साल दरसालचें भाडेकरी या नात्यानीं साल दरसाल नवीन ठराव करून भाड्यांनीं राहणारे कूळ आहांत. संवत १९५७ सालचे नोटिसी प्रमाणें दुकान खालीं करून दिली नाहीं सबब फिर्यादीचें व अपीलाचें काम चालूं होतें .त्याचाही निकाल झाला व संवत १९५८ सालाबद्दल अगाऊ योग्य मुदतीची नोटीस तारीख ७।१०।१९०१ रोजीं दिली कीं आश्वीन वद्य ३० संवत १९५७ रोजीं साल पुरें करून येऊन मकान खालीं करून आमचे कबज्यांत द्यावें. असें न केल्यास दररोज रुपया १॥ रुपया प्रमाणें दुकान आमचे कबज्यांत येई तारखे पावेतों भाडें नुकसानी दाखल जें होईल त्याबद्दल व घर खाली करून घेण्याची व्यवस्था करण्यांच्या खर्चाबद्दल जबाबदार तुह्मी व्हाल. या नोटीसीचा जबाब तुह्मी टपाल मार्गानीं द्यावा असें लिहिले असून आपण आज तारखे पावेतों कांहीं निकाल केला नाहीं. करितां पुन्हां नोटीस देणें भाग झालें. सदर्हू नोटीस पावल्यापासून दोन दिवसांचे आंत आमचे दुकानी येऊन निकाल करून पावती ध्यावी व मकान आमचे ताब्यांत द्यावें. असें न झाल्यास वर लिहिले प्रमाणें दीड रुपया रोज प्रमाणें मकान कबज्यांत घेण्याबद्दल व चालू सालचे भाड्याबद्दल व नोटीसीचे खर्चांसह योग्य तजवीज केली जाईल. कळावें तारीख २८।१०।१९०१ इसवी.

सही

जोरावरमल गंगाधर या नावाच्या

दुकानचे मालक जानकीदास

गंगाधर तर्फे जयराम

बळवंत दस्तुर खुद्द.

## नोटीस

तीर्थ स्वरूप रा. रा. रूपराव दवलतरावजी देशमुख रहाणार वरद तालुके खामगांव यांस:—

नोटीस देणार अमृतराव दवलतरावजी देशमुख रहाणार वरद तालुके खामगांव याजकडून नोटीस देण्यांत येते कीं पूर्वी आपण एकत्र होतो. तुमचे व आमचे बनत नसल्यावरून मजला स्थावर माल मौजे वरद येथील शेत सर्वे नंबर २७–२९–४८–३७–४७–१२पैकीं–३१–२२–२४ पैकी एकूण शेतें ९ नऊ या शिवाय मातुश्री माझ्यांत असल्यावरून मातुश्रीला शेत सर्वे नंबर ४४ पैकीं खाण्याच्या खर्चाकारितां कबूल केलें होतें व कोठडीचे खांब ३० दिवाणखान्याचे खांब ८, दरवाजाचे पश्चिमेकडील वरील माडीसुद्धां या शिवाय वाड्यांतील पश्चिमेकडील बखळ जागा, गढींतील निमे जागा, मौजे माटरगांव बुजरूक येथील धावें खांब ४८ यांतील खांब २४ या शिवाय जंगम माल बैल ९ गोऱ्हे २ ह्मैस १ बकऱ्या निमे, नवारी खंडी ६, दमणी एक मोठी पडद्याची, येणे प्रमाणें स्थावर माल व जंगम माल तुह्मी मजला देण्याचें कबूल केले असून माझे जवळून तुह्मी पावती लिहून घेतली. पावती प्रमाणें मजला फक्त शेतें ९ माझे ताब्यांत दिलीं आहेत तीं माझेच ताब्यांत आहेत. शेती पैकीं शेत सर्वे नंबर ४४ दिलें नाहीं व जंगम माल बैल ८ दिले आणि गोऱ्हे २ बैल १ तुह्मी दिला नाहीं. या शिवाय नवारी खंडी ५ तुह्मी दिली नाहीं बकऱ्या निमे दिल्या नाहींत. दिवाणखान्याच्या वरची माडी खाली करून दिली नाहीं. आणि वाड्यांतील पडीत जागा ती तुह्मी मजला बांधू देत नाहीं तुह्मी आमचे पासून पंचा समक्ष पावती घेतली असून त्याबद्दल मजला तुह्मी मुळींच लेख दिला नाहीं व मजला ह्मटले कीं उद्यां आपण शेगांवास जाऊ व मी तेथें तुह्मास लेख करून देईन व परस्परास आपण रजिस्टर वगैरे करून देऊं. मजला अशी भूलथाप देऊन मजपासून कपटानें पावती घेतली. आतां तुह्मास ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं बकऱ्या निमे बैल एक, गोऱ्हे २, शेत सर्वे नंबर ४४, नवारी खंडी ५, पडीत जागा इतके आह्मास आठ दिवसांच्या आंत द्यावी. व तुमचा लेख आह्मास देऊन तो व आह्मी दिलेली पावती हे रजिष्टर वगैरे परस्परानी परस्परास करून द्यावें असें नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत न केल्यास आह्मी तुह्मास दिलेली पावती रद्द समजली जाऊन रीतशीर अर्ध्या हिशाबद्दल फिर्याद करून नोटिशीच्या खर्चा सुद्धां व कोर्टखर्चासुद्धां वगैरे सर्व खर्च भरून घेतला जाईल कळावे तारीख ३०।१०।०१

सही
अमृतराव दवलतरावजी देशमुख
राहणार वरद तालुके खामगांव पोस्ट जळंब
दस्तुर खुद.

## नोटीस

बेशमी सीताराम नारायण धोबी राहणार आकोला यांस:—

या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी

दारू पिण्याच्या व्यसनामुळें अगदीं बेतालपणें वागता. तुह्मास तुमच्या बायकोची किंवा मुलाबाळांची सुद्धां कांहीं फिकीर नाहीं. तुह्मी सर्वकाळ दारूच्या धुंदींत असता. शुद्धीवर नसल्यामुळें तुह्माला प्रपंच करिता सवरता येत नाहीं. वडिलोपार्जित एक घर जागेश्वरीच्या बोळांत आहे तें तुह्मी विकून टाकण्याच्या बेतांत आहां असें कळतें. तुह्माला घर विकण्याचा अधिकार नाहीं. तीघेही मुलगे अल्पवयी आहेत. त्यांचा हिस्सा तुह्माला विकता येत नाहीं. तुह्मी नीटपणें न वागाल व दारूचें व्यसन न सोडाल तर मुलाबाळाच्या संगोपनासाठीं मला तुह्मास वेडे ठरवून इस्पितळांत ठेवावें लागेल आणि सर्व इस्टेटीची व्यवस्था मी आपल्या हातीं पूर्वींच घेतलेली आहे. आणि इतर साहूसावकार वगैरे लोकांनींही या नोटिशींतील मजकूर वाचून नंतर काय तो व्यवहार करावा. कळावें तारीख ३०।१०।०१

सही
भोन्या वल्लद सिताराम
सोन्या वल्लद सिताराम
गण्या वल्लद सिताराम तिघेही
अज्ञान तर्फे पालन करणार आई यमुना
निशाणी बांगडी

## नोटीस

बेशमी गंगाराम वल्लद मरुती लोहार रहाणार चिखलगांव ता. बाळापूर पोस्ट पातूर शेखबाबू यांस:—

मी खाली सही करणार या लेखानें असें कळवितें कीं, आपली प्रकृति कांहीं रोगानें बिघडल्यामुळें औषधोपचार स्वस्थपणें करण्य साठीं मला आज पांचवर्षांखालीं माझ्या बापाचे घरीं आणून घातलें. बारा महिन्यांनीं मला परत घेऊन जाण्याचा करार केला होता पण आज ह्या चार पांच वर्षांमध्यें तुह्मी माझी कांहींच वास्तपुस्त केली नाहीं. आपला रोग अद्याप बरा झाला नाहीं खरा पण माझ्या पोटापाण्याची कांहीं तजवीज आपण अद्याप करींत नाहीं ह्मणून ही नोटीस देणें भाग पडलें. तर आतां ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसांचे आंत मला आपल्या घरीं घेऊन जावें व मला इतके दिवसाच्या अन्नवस्त्राबद्दल झालेलें कर्ज अंदाज रुपये १९९ हे देऊन टाकावेत. असें मुदतींत न कराल तर मला दुसरा घरठाव करून माझी सोय लाविली पाहिजे सबब हीच नोटीस फारकती समजून मी दुसरा गंधर्व लावीन. मग आपला मजवर नवेरपणाचा कसलाही हक्क रहाणार नाहीं. शिवाय मला झालेल्या १९९ रुपयाच्या कर्जाबद्दल सरकारांत फिर्याद करून निकाला पर्यंतच्या खर्चासह सर्व रक्कम करून घेणें भाग पडेल. ह्मणून अगाऊ सूचना केली आहे. कळावें. तारीख १ माहे नोव्हेंबर सन १९०१ इ०

सहीची निशाणी
बांगडी पुतळी मर्द गंगाराम लोहार हल्लीं वस्ती शेंबे बुजरुक ता. मलकापूर.
पोष्ट बोराखडी तर्फे तानकु वल्लद नारायण लोहार वस्ती शेंबे बुजरुक याची निशाणी खुद्द.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १९ जुलै } A. G. Watson
१८९८ Agent.

नोव्हेंबरमध्यें छापून तयार होईल.
SAPKAR'S.
**DIARY FOR 1902**
WITH
A Calendar for 1903
सापकरांची.
**पॉकेट रोजनिशी.**
सन १९०२ सालाकरितां.

एका पानावर एक तारीख व जरूर लागणाऱ्या माहितीसह कागद सुरेख आणि बायडिंग मजबूत केलें जाईल.

किंमत ८४ आणे ट. ख. ८।८६


आगाऊ पैसे आल्यास डायरी तयार होतांच पाठविण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक.

## खरेदी करा!
## रास्कोपची थेट व खरी पेटेंट वाचेस
## नकली मालास भुलून पैसे खर्चू नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारे असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतके लिहिले असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून, चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्याबद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनचें मोठ्या आकाराच्या वाचचा आहे.



मोठे, मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**
१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**
१८ लाईन ओपनफेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.**
रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ् हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ..................२०

**इन्गन्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें**
१९ लाईन ओपनफेस............२०
१९ ,, हंटिंग......................२५
१४ ,, रिस्टवॉच....................१२

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**
१४ लाईन रिस्टवॉच..............३०
१४ ,, हंटिंग......................३६
१८ व १९ ,, ओपनफेस............३०
१९ ,, सेंकंद कांट्यासह............ ३२
१९ ,, मध्यभागीं सेंकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३९
१९ ,, हंटिंग .................... ४०
लेडीज वॉचीस १४,,१८ क्यारेट गोल्ड रुपये ६५=२०० पर्यंत.

**सी. हीनीगर आणि कंपनी.**
ओरिजिनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड मुंबई.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनी छापून प्रसिद्ध केलें.

REGISERED N. No. 4

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ....................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

Six monthly........ 3 ............... 8 as
Single copy ............................ 4 as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXV | AKOLA MONDAY 11 NOVEMBER 1901 | NO 44

वर्ष ३५ | आकोला सोमवार तारीख ११ माहे नोव्हेंबर सन १९०१ इ० | अंक ४४

## कविवर्य मोरोपंत

( या विषयावर अकोला लायब्ररींत मि. काळेले यांनीं ता. ६ आक्टोबर रोजीं व्याख्यान दिलें त्यावर रा. रा. वि. आ. काणे यांनीं अध्यक्ष या नात्यानें भाषण केलें तें )

( मागील अंकावरून )

सृष्टपदार्थगत व्यापाराकडेही या कवीचें लक्ष पोंचलें होतें. सामान्य जनसमूहाचें समाधान, सृष्ट्यंतर्गत व्यापारां विषयीं काहीं तरी सांगितल्यानें होतें. पण जिज्ञासु व तत्वशोधकांची गोष्ट तशी नाहीं. रवि किरणांनीं समुद्राचें जळ शोषलें जाऊन मेघ उत्पन्न होतात ही कल्पना दाखविणारीं काहीं पद्यें याच्या ग्रंथांत आहेत. तसेंच वायु या अत्यंत विरल तत्वावर ध्वनीच्या लाटा आदळून, त्यांचा प्राण्याच्या कर्णेंद्रियावर मृदु आघात होतो व त्यांस ध्वनीचें ज्ञान होतें असें कांहीं ठिकाणीं वर्णन आहे. प्रजासत्ताक राज्याचीं मूलतत्वें अनेक ठिकाणीं दाखविलीं आहेत. येणें प्रमाणें, अधुनिक ज्या सुधारणा प्रचारांत येऊं पाहत आहेत, व ज्या येणें रास्तच आहे, त्याचें दिग्दर्शन या कवीच्या काव्यात जागजागीं आढळतें.

असो. आतां आणखी एका गोष्टीचा विचार कर्तव्य आहे. ती ही कीं काव्य ह्मणजे काव्यत्व होय हें नेहमीं लक्षांत असावें. यमकें, प्रास, अनुप्रास, इत्यादिकानीं त्याचें नियमन केलें आहे. याच्या योगानेंच काव्यास श्रोतेमनोहरत्व आलेलें आहे आणि ह्मणूनच त्याच्या नादास मनुष्य लागतो. प्रास, यमकरहितही काव्य असतें, आणि काव्यांत आणखीही भिन्न प्रकार पुष्कळच असतात. आतां अशीं काव्यें करून कवि निघून गेला. तो, तीं कशीं व कशास्तव केलीं तें सांगावयास येत नाहीं. यास्तव फार बारिक विचाराची दुर्बीण करून कवीचें खरें हृद्गत काय आहे तें शोधून काढणें आपलें काम आहे. शिवाय भिन्न भिन्न रुचीचे लोक असतात यावर कवीस दृष्टि द्यावी लागते. आपल्या कवीची या सर्व गोष्टींवर नजर होती असे दिसून येईल. कोणत्या मासल्याचा पदार्थ किती तयार करून ठेवावा हें तो जाणत होता. ह्मणून काहीं पदार्थ मासला दाखविण्या पुरतेच त्यानें निर्माण केले. लोक काहीं ह्मणोत, एखादा अम्ल किंवा तिक्त पदार्थ त्यांस फार आवडला, असें ते ह्मणोत, तरी कोणता पदार्थ पुष्कळ सेवन केला असताहि वीट येणार नाहीं व पथ्यकर होईल, हें कवी जाणून होता. उदाहरणार्थ, ज्यात बालकाचे बोबडे शब्द घातले आहेत, अशा, या कवीच्या सगळ्या संग्रहांत दोनच आर्या आहेत. ( व्याख्यात्यांनीं त्या दिल्या आहेत. ) त्याः—

सगजावुनि त्यांसि ह्मणे,
ऐसें लालिवलासि मालीन ॥
कां ललतां आळलतां,
पलतां मी सागलांत तालीन ॥ १ ॥

गोपशिशु ह्मणति पलिसा,
लडतां हलिनेंचि झालिला घाम ॥
गाला उलोनि पलला,
सल्व ललें नवल कलितसां काय ॥ २ ॥

ही एक चमत्कृति आहे ह्मणून तिचा त्यानें आदर केला. पण तिचें असकृत दर्शन झाल्यास तींतील चमत्कार नष्ट होईल हें त्यास ठाऊक होतें असें दिसतें. 'अनल समीहित सार्वी'- अशा प्रकारची आर्या तर त्याच्या लक्षावधि पद्यांत एकच आहे. यमकाविरहित कविता ह्मटली ह्मणजे गीतेचें भाषांतर इतकीच दिसते. ज्यांत एखाद्या वर्णाची अनेक वेळ आवृत्ति झाली आहे अशीं पद्येंहि फारच थोडीं आहेत. मासला पहा :—

सौमद्र प्रमुखानीं,
कुरुसेना जेवि वायनीं तरणी ॥
कीं काम विकारांनीं,
कांपविली कामिनी नवा तरणी ॥ १
अवळाकेताांत अर्धी,
मुरला लावण्य कल्प लतिकेला ॥
त्यांत तिणें उचितादर,
सहित मधुरोदितेंहि अति केला ॥ २
कांत स्नेह रसभर,
प्रज्वलित करी बहु स्मर ज्वलना ॥
मुरल्या लीला लोकन,
ललिताधर पल्लवा सर्वे ललना ॥ ३

नगरींचे देशींचे,
जन आटोकाट दाटले थाट ॥
दे वेत्रपाणि वाचनि,
वृंद वहाया न वायुला वाट ॥ ४
भूषा भुजंग भक्ता,
भीतिद भव्य प्रभाव तुज भार ॥
यावी भयें भवानी,
भर्ता भगवान् भुजे भला फार ॥ ५
सुटल्या सटा समस्ता,
सुर—सरिता—सलिल सर्प सोम सुधा ॥
सांडिति सरणींत ह्मणे,
सूत शुक व्यास सर्व सत्य बुधा ॥ ६

ज्या एका शब्दांत विवक्षित वर्णाची दोन वेळ आवृत्ति झाली आहे, किंवा तो वर्ण द्वित्त झाला आहे त्यांची निवड केली आहे, व कोठें सावर्ण अक्षर योजिलें आहे. आतां हे मूळचे अर्थालंकार नव्हत, शब्दालंकार होत हे लक्षांत घेऊन पाहिलें ह्मणजे अर्थहानि वाटणार नाहीं.

या प्रकारच्या पद्य संख्येच्या अल्पत्वा वरून कवि असें ह्मणतांना दिसतो कीं लोकहो ! पहा ! हे निरनिराळे प्रकार मासल्याकरितां व मासल्या पुरतेच दाखविले आहेत. अधिकाची मी इच्छा करीत नाहीं व तुह्मीही करूं नका. कारण त्या इच्छेंत अरसिकत्व लपून बसलें आहे.

आतां ज्या पध्दतीचा कंटाळा येणार नाहीं, व पूर्वीं ह्मटल्या प्रमाणें ज्यांच्या मुळेंच कवितेस मनोहरत्व येतें, ती यमक व प्रास यांची साधारण पद्धति कवीनें अंगिकारिली आहे. व त्याचा तो हेतु पूर्णतेस गेला आहे. आतां असें करितांना ज्या ठिकाणीं या नादास तो विशेष लागला तेथें ती रचना खरोखर क्लिष्ट झाली आहे, व हा सहज परिणाम होय. तरी अशीं स्थळें इतकीं थोडीं आहेत कीं, त्यांचा उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. तरी सत्यशोधनाच्या संकल्पानें निवड केली तर तशीं काहीं स्थळें आहत व बारीक दृष्टीनें पाहिल्यास तीं दिसतील ही गोष्ट खरी आहे. असो. आतां आपण असें कल्पूं कीं, सर्व भारतरामायणादि ग्रंथ कवीनें मोकळ्या ह्मणजे अनियमित भाषेनें रचिले आहेत. तर यमक प्रासादि नियमा मळें त्याच्या कवितेची संगति आपण बहुत वर्षें धरिली आहे, तिचा मला वाटतें थोडक्या अवकाशांत आपण त्याग केला असता.

याच्या काव्याच्या परिशीलनानें, भाविक जनांस परमार्थ लाभ होईलच. व व्याख्यात्यांनीं सांगितल्या प्रमाणें, विद्यार्थ्यांनीं याचा अभ्यास केल्यास मनोरंजना शिवायाहि आणखी पुष्कळ लाभ होतील. त्यांना व्यवहारचातुर्य यईल व नीतीचे मार्ग दिसतील. या शिवाय भाषाशुद्धीचा फार मोठा लाभ मिळेल. इतर गोष्टी संभाळून भाषाशुद्धत्वाकडे याचा केवढा कटाक्ष आहे तें प्रसिद्धच आहे. ह्मणजे या संबंधांत याचा जोडीदार कोणीच नाहीं. व्याकरणशास्त्र ही भाषेची मोठी कसोटी आहे. प्रसाद हा काव्याचा आत्मा, व व्याकरणशास्त्र हें काव्यरूप शरीराचीं इंद्रियें व अवयव या विषयींची चालकशक्ति होय. या शास्त्राच्या नियामकत्वामुळें ते अवयव व तीं इंद्रियें आपल्या भिन्न क्रिया करण्यास समर्थ होतात. या शास्त्राकडे दुर्लक्ष केल्यास अर्थाचा अनर्थ होऊन जाईल. शब्द सृष्टींत ज्या अगदीं एका सारख्या एक व्यक्ति दिसतात त्यांच्या गुणधर्माचें वर्गीकरण करण्यास या शास्त्राचें मोठेंच सहाय लागतें या शास्त्रांत काना, मात्रा, व्यंजन हें देखील कमी ज्यास्त चालावयाचें नाहीं. कांहीं शब्द दोन वर्गांत मोडतात. कांहीं साहून आधिक्यांत जातात, इष्ट वर्गांत त्या शब्दांस आणून ठेवण्यास याच शास्त्राचा उपयोग होतो.

सधूंनीं, सेनांनीं, गृहें, जळें, कमळें असा, असें, असे, होता, परिसा, करिता, करितां, इ० शब्द कोणत्या वर्गांत मोडतात तें समजणार नाहीं तर काव्याची गोडी घेणें कठीण होईल.

याच्या काव्यांत आणखी एक विशेष हा आहे कीं, मूळचें लघु किंवा गुरु अक्षर यानें वृत्त सुखार्थ कचितच उलटें केलें असेल जसें कवि, रवि, पवि, चवि, पति, यति, सति, मति, नति, अति, भक्ति, सक्ति, इ० किंवा, नीति, प्रीति, रीति, कीर्ति, गीति इ० किंवा; उदार, कुमार, उपाय, इ० किंवा; कूप, भूप, रूप, सूक्ष्म, पीयूष, वीर्य, दीन, हीन, नीच, नवीन, नूतन इ० यांत ऱ्हस्वाचें दीर्घ किंवा, दीर्घाचें ऱ्हस्व केलें नाहीं. तसें केल्यानें सौंदर्यास डांबर फांसल्या सारखें होईल.

व्याकरण शास्त्र सोडून दिल्यानें काव्या विषयीं अनादर बुद्धि उत्पन्न होते तो कमीपणा भरून काढण्यासारखी कवीची अप्रतिम वर्णनशैली असल्यास मात्र विद्वज्जन त्या काव्याचा आदर करितील. पण अगोदर अप्रतिम वर्णनशैली आणि व्याकरण शास्त्राच्या ज्ञानाचा अभाव यांचें ऐक्य असण्याचा संभवच थोडा आहे.

या कवीचा आणखी विशेष ह्मटला ह्मणजे त्याच्या भाषेचें विलक्षण वळण. तें अत्यंत खुबीदार असून इतर वळणांत मिसळ तच नाहीं.

आर्या छंदाहून श्लोक वगैरे इतर वृत्तांतही यानें कविता केली आहे ती कशी उतरली आहे तें, सीतारामायण, भावरामायण, बृहद्दशम उत्तरार्ध इ० प्रकरणें वाचून पहावीं ह्मणजे समजेल.

पौराणिक विषयांशिवाय दुसऱ्या अनेक गोष्टी यानें कवितांचे विषय केले आहेत. यावरून याच्या मनाची धांव कोणीकडे होती हें दिसेल.

पुराण सांगत होता, ह्मणून पुराणीक होता. आपल्या नांवास पंडित, आचार्य इ० उपपदें आपण होऊन जोडिलीं नाहींत, पंचकाव्यें, नाटकें, यांचा परिचय होता असें दिसत नाहीं, वगैरे शंका विचारशक्तीचा शुष्कपणा दाखवितात. या संबंधानें का. सं. अंक १०६ पहावा.

याच्या काव्यांत अल्प दोष असले तरी तिकडे विशेष लक्ष देणें आपणास उचित नाहीं. वि. ज्ञा. विस्तार कर्त्यानें मोठ्या श्रमानें आपल्या मतें दूषणीय अशा दोन तीन आर्या दाखविल्या होत्या व नि. मा. कर्त्यानें अशीं तीन चार पद्यें आपल्या चुकीचीं ह्मणून पुढें केलीं. पण हीं चुकीचीं ह्मणून लोकांनीं क[illegible] नाहींतच. व चुकी काढणाऱ्याकडे व दाखविल्या आहेत. आणि तद्दशिकर्त्यानें मोठ्या प्रांजळ बु[illegible]ची परीक्षा दुरुस्त केलीं आहेत. असें १८ माणसें ग्रंथांत काहीं दोष आहे. या आं-पण ते पराकाष्टेचे अस्पष्ट समाधान-

रत्नांच्या खाणींत शिरून तेथें पडलेलीं असंख्य तेजःपुंज रत्नें आपण घ्यावीं. कमी दर्जाचीं घेऊं नयेत. शतावधि उत्तम मोत्यांचें कंठ्यांतील एकादें काळसर व दोरा गेलेलें मोतीं घेऊं नये, व त्यावरून त्या अलंकाराची योग्यता ठरवूं नये.

निबंधमाला कर्त्यांनीं, एक दोन संस्कृत पद्यांचे संबंधानें शंका घेतली असें वर ह्मटलें आहे पण ते पाठच चुकीचे आहेत असें शोधक दाखवितात.

"काव्यसंग्रह" पुस्तक इतकें जपून काढितात, व इतर काव्यग्रंथही काळजीपूर्वक छापले जातात, तरी, कर्त्यांची दृष्टी चुकवून अशुद्धें व अपपाठ त्यांत घुसतातच. व प्रति, आणि प्रतींच्या प्रती करण्यांत प्रमाद घडतात त्याबद्दल मूळ कवीस दोष कसा लावावा? पहा.

( १ )

मंत्र भागवत एकादशस्कंध. पंडिताचें लक्षण

अंक १०९ का. सं.

गलिताऽहंकृति जाणे,
बंधा मोक्षासि अनुभवीं चढला ॥
तो पंडित; इतर नव्हे,
जरि पुष्कळ शास्त्र सर्वही पढला ॥

( किंवा ) जरि पुष्कळ सर्व शास्त्रही पढला

आतां "पुष्कळ शास्त्र सर्व" किंव "पुष्कळ सर्व शास्त्र" ह्मणजे काय? तर हे दोन्ही पाठ चुकीचे आहेत. 'एक शब्द चुकल्यामुळें अनेक दोष उत्पन्न झाले आहेत. येथें कवीचा काय अन्याय? खरा पाठ असा आहे. 'जरि पुष्कळ वेद शास्त्रही पढला'

( २ )

अंक १०० का. सं. भीष्मभक्ति-भाग्य

ह्मणउनि याचिष्छंदें,
नवमींची वर्णितों कथा सुरसा ॥
त्यजिन कदापि न अर्था,
कृपण जसा कीं नभःपथा सुरसा ॥ +

× येथें सुरसा ह्मणजे देवसा असें टीपेंत ह्मटलें आहे तेथें "सूर्यसा" ह्मटलें पाहिजे.

आर्यार्ध ( ३ )

अंक १०४ द्रोणपर्व.

आवरितां आटोपी,
त्यासि पदीं भीमसेन तो साव्या × ॥

× येथें टीपेंत सहाव्यास ह्मणजे धृष्टद्युम्नास असें ह्मटलें आहे ( पांच पांडव व सहावा धृष्टद्युम्न. )

येथें साव्या ( सहाव्या ) हें क्रमसंख्या विशेषण, व पदीं हें याचें विशेष्य वाटतें. टीपेंतील अर्थानें घोंटाळा

( ४ )

[illegible] व्रतसें,
[illegible] मज्जाया ॥
[illegible] तेणें,
[illegible] स मज्जाया ॥

"श्री मयूर कवि" हें पुस्तक. पु. २ अ. १० स्त्रीपर्व. आगष्ट १८९१

गांधारीनें भीमसेनास पुसलें, तूं दुःशासनाचा भाऊ असून त्याचें रक्त कसें प्यालास? येथें आपणास निर्दोषी करण्या करितां भीमसेन सांगतो. तें रक्त मी प्यालों नाहीं. माझ्या जायेनें तें प्राशिलें. टीपेंत जाया शद्बाचा अर्थ द्रौपदी असा दिला आहे. तेथें हिडिंबी शद्बाची अपेक्षा आहे. वेणी सं० नाटकांतील राक्षस रुधिरप्रिय व राक्षसी वसागंधा यांचा संवाद पहा. "द्रौपदी" असें ह्मटल्यानें भीमाच्या दोषांत भर पडते.

( ५ )

आनंद तनय अरणी-
कर शोभवि कवन फार यम कांहीं ॥
तत्सूक्ति पाठ ज्याला,
याचें पाहे न भवन यम कांहीं ॥

या आर्येंत 'कवन फार यमकांहीं' या ठिकाणीं 'फार कवन यमकांहीं' असें पाहिजे.

( ६ )

आर्या छंदें जोडुनि,
रामायण भारतादि आयकवी ॥
नायक वीर कवींचा,
ऐसा होईल काय अन्य कवी ॥

या आर्येंतही, 'काय अन्य कवी' ग्या ठिकाणीं 'अन्य काय कवी' असें पाहिजे.

आतां या चुका हस्तदोषाच्या आहेत हें खरें, तरी काव्यांत त्यांजकडे अलक्ष केलें तर आणखी एक दोन आवृत्तीं नंतर त्यांचें स्वरूप अधिक भयंकर होईल. सारांश मूळचें शुद्ध नाणें असतां याचें रूपांतर व स्थित्यंतर झाल्यावर ह्मणजे तें हिणकट व डांकलग झाल्यावर हेंच तुमचें नाणें असें त्याच्या मालकास ह्मणावें तसा हा प्रकार होईल असो. आतां थोडक्यांत सांगायाचें ह्मणजेः—

या कवीच्या काव्यांत मनास थक्क करणारे शद्बरचनेचे चमत्कार, सुरेख अर्थालंकार, पद्यांत सहज गुंफून दिलेलीं सुभाषितें व इतर भाषणसंप्रदाय पहावयास मिळतील. मराठी भाषेवर पूर्ण प्रभुत्व असल्यामुळें वांछित शद्ब व वाक्यें हात जोडून याच्या पुढें उभीं होतीं कीं काय असा भास होईल.

जशी एखादी महानदी समोरचे पहाड फोडून, डोंगरांचे कड्यांतून, मैदानांतून, व अरण्यांतून, फोंफावत आपल्या प्रियकराकडे धांव घेते व ज्या प्रदेशांतून ती जाते त्याच्या रचने प्रमाणें केव्हां गंभीर मुद्रा धरिते, केव्हां खळखळाट करिते, व कोठें आवेशानें दोन्ही तटे फोडून आसमंतातील प्रदेश जळमय करून टाकिते, तरी या सर्व पर्यायांत तिचें स्वरूप आल्हादजनक व रमणीयच दिसतें तशीच ही कविता, विषय वैचित्र्या प्रमाणें, रसपरिपाकाच्या संबंधानें अत्यंत आल्हाद देणारी आहे. असो.

या प्रमाणें आजच्या व्याख्याना बद्दल सुचलेले विचार मीं कळविले. लोकांनीं असले ग्रंथ स्वतः काळजीपूर्वक वाचून स्वमत ठरवावें. याहून अधिक सांगण्याची गरज नाहीं. कारण कीं:—

यदि संति गुणाः पुंसां विकसन्त्येव ते स्वयम्
न हि कस्तूरिकागंधः शपथेन विभाव्यते.

आपल्या देशांत अशा प्रकारचा कवि निर्माण झाल्याबद्दल आपणास फार मोठा अभिमान वाटणें स्वाभाविक आहे.

( समाप्त )

# वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ३० शके १८२३

## शारीरिक शिक्षण.

मे० क्यांडी साहेब डायरेक्टर यांचें लक्ष्य विद्यार्थ्यांच्या शरीरसंपत्तीकडे विशेष आहे. ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. ते आल्यापासून त्यांनीं व्यायामाचे पुष्कळसे खेळ शाळांतून चालू केले आणि यामुळें व्यायामाची विद्यार्थ्यांस एक विलक्षण गोडी व हौस वाटूं लागली आहे. तरुण पिढीच्या मंडळीच्या शरीराची कांठी मोडकी तोडकी नसावी, त्यांच्या अंगांत नवीन रक्ताचा तापटपणा असावा, त्यांच्या शरीराचा खुजटपणा, त्यांची रोगी प्रकृति व त्यांची निस्तेज व फिके चेहेरेपट्टी हीं नष्ट व्हावीं, तसेंच त्यांची शरीरकांती ताजीतवानी व मुसमुसलेली दिसावी ह्मणून डायरेक्टर साहेबांचा मोठा प्रयत्न चालला आहे. जीं मुलें घरची सुखी व श्रीमान् आहेत यांस नवीन क्रिकेटच खेळ वगैरे खेळण्याला पैसाही खर्चितां येतो. पण ज्यांची घरीं खाण्यापिण्याची अबाळ होते व विद्यार्जनासाठींच पैसा मोठ्या पराकाष्टेनें मिळतो त्यांस क्रिकेट सारखे पैशाचे खेळ खेळण्यास अडचण विशेष पडत असेल ही गोष्ट खरी. तथापि हल्लीं शारीरिक शिक्षणाचा जो सर्व साधारण उत्कर्ष होत आहे तो पाहून मनाला मोठा संतोष वाटतो. पण इंग्रजी पुष्कळ खर्चानें प्राप्त होणाऱ्या खेळाकडे तरुण मंडळींचें मन वेधलें आहे ही गोष्ट चांगलीशी नाहीं. क्रिकेट, फूट बॉल वगैरे खेळ खर्चाचेच आहेत देशी खेळ विद्यार्थ्यांस आवडेनातसे झाले आहेत ही स्थिती कोणास रुचणार नाहीं. आमच्या मतें मे० क्यांडी साहेब देशी खेळ ह्मणजे आट्या पाट्या, खो खो, कुस्ती, कसरत इत्यादि खेळ विद्यार्थी मंडळींमध्यें प्रचलित करितील तर लोक त्याचे विशेष ऋणी होतील. देशी खेळाला प्रोत्साहन मिळालें पाहिजे आणि त्याच खेळांची चहा विशेष झाली पाहिजे.

शाळाखात्याला पुरेसा फंड मिळत नाहीं ह्मणून मे० क्यांडी साहेबांच्या मनांतल्या गोष्टी मनांतच राहतात त्यास उपाय नाहीं त ह्मणतात कीं कसरती मास्तराला पगार अवघा १० रुपये मिळतो आणि तशा पगारावर चांगले शिक्षक मिळण्याचा संभवच नाहीं. ही गोष्ट कांहीं खोटी नव्हे. गेल्या वर्षापासून एक एका कसरती मास्तराकडे १०।१२ शाळा पेक्षां अधिक शाळा ठेवण्याची रीत बंद केली आहे आणि तेव्हां पासुन थोडी बहुत विशेष सुधारणा कसरती संबंधानें झाली असेल हें खचित आहे. मुलांस कवाईत शिकविण्याची कामगिरी प्रत्येक शिक्षकाकडे सोपविली आहे आणि पुष्कळसे शिक्षक या कामांत चांगलें लक्ष्य पुरवितात आणि या मानानें विद्यार्थ्यांच्या अंगीं तितकी चपलताही अधिक दृश्यमान होते. इंग्रजी मराठी शाळा व हायस्कुलें यामध्यें क्रिकेट व फूटबाल यांची चहा विशेष आहे.

'वऱ्हाड मल्ल समाज' ह्मणून एक संस्था मे० क्यांडी साहेबांनीं स्थापित केली आहे आणि तिच्या आश्रयाखालीं गेल्या दिसेंबरांत उमरावती व अकोला या दोन हायस्कूलच्या विद्यार्थ्यांमध्यें मोठा सामना झाला आणि त्या समयीं अकोल्याच्या मैदानाला मोठी शोभा आली होती. यंदा हे सामने उमरावतीस होणार आहेत. रावबहादूर दत्तात्रय विष्णु भागवत यांनीं या संस्थेला १०० रुपयांची देणगी दिली आहे. या संस्थेच्या फंडासाठीं मोठी वर्गणी जमाविण्याचा विचार आहे आणि उत्तरोत्तर लोकांत शारिरीक शिक्षणाची जी गोडी लागली आहे तिजवरून मे. क्यांडी साहेबांस वर्गणीच्या कामीं चांगलें यश येईल असें आह्मांस वाटतें. या वर्गणी संबंधानें आमची एक विशेष सूचना आहे. राष्ट्रीय सभा वगैरे संस्थांच्या वर्गण्या सरकारी अधिकारी चुकावितात. तेव्हां अशा चोरवाटेच्या मार्गाचा आश्रय करणाऱ्या सरकारी अंमलदारा कडून या निरुपद्रवी व अत्यंत उपयोगी संस्थेला संपूर्ण आश्रय मिळाला पाहिजे. मे. क्यांडी साहबच या मल्लसमाजाचे पुरस्कर्ते आहेत तेव्हां कोणचेहि तर्कवितर्क काढण्यालाहि स्थल रहाणार नाहीं.

## शिल्पशाला

अलिकडे लोकांस असें वाटतें कीं विद्या फार वाढल्या आहेत आणि त्या अर्धवट शिकतां शिकतांच निम्मे आयुष्य वाया जातें. विद्यार्थी दुनियेदारीला लागतो तेव्हांच तो बहुतेक निःसत्व व श्रमलेला भागलेला असा दिसतो व तो प्रपंचाचा जड बोजा उचलण्याला मोठासा समर्थ नसतो. विद्याव्यासंगामुळें तो पुस्तकी पोपट असतो आणि याचें पढित ब्रह्मज्ञान त्याच्या दुनियेदारींतील आवश्यक गोष्टींना फारसें उपयोगीहि पडत नाहीं. वरील समजूत अगदींच निराधार आहे असें आह्मांस वाटत नाहीं. नवीन पिढीच्या मंडळीला चरितार्थाची देखील मारामारच पडते. शीतल व सुरम्य अशा विद्यामंदिरांत त्यांचें पूर्ववय जातें आणि नियमितपणानें एखाद्या यंत्रा सारखें अनेक परीक्षांच्या चक्रा भोंवतीं त्यांस फिरावें लागतें. अशा व्यवसायांत आयुष्याचा पूर्व भाग वेंचला जातो. आणि या मुळें

दुनियेदाराला लागणारा कंटकपणा त्यांच्या अंगीं रहात नाहीं. आणि जगामध्यें कांहीं उद्योगधंदा करण्या इतकीहि त्यांच्या अंगीं शक्ति व अक्कल नसते. हा दोष विद्यार्थ्यांचा नाहीं. सांप्रतच्या शिक्षण पद्धतींतच हें मोठें व्यंग आहे.

हा नेभळेपणा जावा ह्मणून शिल्पकर्माचें शिक्षण विद्यार्थ्यांस देण्याचा विचार स्थानिक सरकारानें केला आहे. प्रारंभाला ही सुधारणा कशी काय फुलाफळास येते हें पाहण्यासाठीं शिल्पकर्माचा वर्ग आकोला हायस्कुलास जोडण्याविषयीं अलिशान रेसिडेंट साहेबांनीं हुकूम दिला आहे. शिल्प विद्या ह्मणजे हस्तकौशल्याच्या विद्या होत. सुतारकी, लोहारकी, शेतकी इत्यादि विषय शिकाविण्याचा सरकारचा संकेत आहे. या विद्येनें विद्यार्थ्यांमध्यें टणकपणा येईल आणि त्यांची प्रवृत्ति उद्योग धंद्याकडेही लागेल. राव बहादुर दत्तात्रय विष्णु भागवत यांची शिल्पशाले विषयींची मूळची सूचना होती आणि तिला रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी व मे. क्याडी साहेब यांनीं मोठा जोर दिला ह्मणून ती वरिष्ठ सरकारास पसंत पडली. शिल्पशालेचा प्रयोग आकोला हायस्कुला पुरता प्रथम केला जाणार आहे आणि आमच्या मतानें हा प्रयोग विद्यार्थी वर्गास मोठा हितकर होईल. कदाचित् विद्यार्जनाचा कालही वाढला जाईल तरी कल्याणाच्या बाजूनें तसें होणें उत्तम आहे.

---

## वसुधैव कुटुंबकम्

( भूतदयेचा उद्भव )

नंबर २

आतां, भूतदया हा स्वतःसिद्ध मानुषधर्म आहे कीं काय याचा विचार करूं:—

सर्व सद्गुणांचीं किंवा दुर्गुणांचीं स्थानें मनुष्याच्या शरीरगत आहेतच, व तेथें ते सद्गुण किंवा दुर्गुण बीजरूपानें वास करीत असतात. परंतु त्या बीजरूप सद्गुणांचा फलपुष्प धारण करणारा वृक्ष बनविण्यास मनुष्यास सदोदित ऐकण्याची, पाहण्याची व मनन करण्याची संवय लागली पाहिजे. सज्जनांचें बुद्धिवाद, क्षमाशील वदान्य, परोपकाररत, धीर, व नयनिपुण पुरुषांचीं चरित्रें हे कित्ते पुढें न ठेविल्यास, मूल तत्वरूप असलेले सद्गुण जागच्या जागींच मुरतील व अशोधित धातू प्रमाणें त्यांची अवस्था होईल. तिचे अलंकार घडतां येणार नाहींत व तशा धातूस उपयुक्तता देतां येणार नाहीं.

असें एखादें वचन असतें कीं, तें एकदांच कानावर पडल्यानें, व अशी एकादी कृति असते कीं, ती एकवेळ नजरेस पडल्यानें, मनुष्याच्या पुढील आयुष्य क्रमांत मोठा फरक पडतो.

भूतदया अंगांत असणें हा उपजत गुण आहे असें ह्मणतात, तें सर्वथैव खरें आहे असें नाहीं. योग्य शिक्षणानें भूतदया उत्पन्न होते, किंवा मूळची असली तर ती वाढते. विचारांत जसा फरक होत जातो, तसे भूतदयेचे अंकूर फुटूं लागतात. बहुतेक रानटी लोक हिंस्त्र पशूं प्रमाणें क्रूर कर्में करणारेच आढळतात. पण शिक्षण मिळालें ह्मणजे त्यांची बुद्धि जाग्यावर येते, व त्यांस सुविचार सुचूं लागतात. मग ते स्वतःस मनुष्य लेखितात व दुसऱ्यांसही मनुष्य समजून, तसेंच त्यांच्याशीं वागतात. जसजसे विद्येचे संस्कार मनावर होत जातात तसतसे भूतदयेचे हेतु पूर्ण करण्याची स्फूर्ति होते.

अज्ञान हें सर्व दुर्गुणांचें माहेर घर आहे. काम क्रोधादि षड्रिपु त्यांत वास करितात. भूतदया हा दुर्गुण नाहीं. तो दुर्गुण असता तर अज्ञानाचे घरांत त्यास जागा मिळती. दया, क्षमा, शांति, उदारता यांच्या प्रमाणेंच भूतदया हा सद्गुण आहे. या सद्गुणसमुदास अज्ञानरूप गृहांत थारा मिळावयाचाच नाहीं. त्या अज्ञानास त्याच्या दुर्गुण परिवारासहित हांकून देऊन तेथें ज्ञानाची मालकी स्थापिल्या वांचून सद्गुणांच्या वसति स्थानाची सोय होणार नाहीं. यावरून दिसेल कीं, अज्ञानाचे अवस्थेंत भूतदया असते हें ह्मणणें त्या स्थितीचा विपर्यास करणें होय. उज्वल कल्पनांनीं मन विकसित झालें नसतांही तेथें सद्गुणांस राहण्यास जागा मिळतें हें ह्मणणें असंबद्ध होय. तेथें भूतदया मूळ रूपानें दिसली तरी ती नसल्या सारखीच आहे. सर्व दुर्गुणांचें माहेर घर अज्ञान, तसें ज्ञान हें सर्व सद्गुणांचें आश्रय स्थान आहे.

---

## राज्याभिषेक.

पुढील सालीं चक्रवर्ती बादशहा ७ वे एडवर्ड यांस राज्याभिषेक विलायतेस होणार आहे आणि त्या महोत्सवाच्या आनंददायक समयाला विलायतेस एक अप्रतिम, वैभवशाली व टोलेजंग असा रमणीय समारंभ होणार असून त्याच्या योजना आतां पासून चलूं आहेत. ही आल्हादवेला जून महिन्यांतली निश्चित केलेली आहे. असा प्रसंग पाहण्याचा योग ज्या प्रारब्धवान् नरश्रेष्टांच्या भाग्याला येईल त्यांचा जन्म खरोखर सफलतेला पावेल. या समारंभासाठीं इंडियांतील राजेरजवाडे व संस्थानिक यांच्या पैकीं श्रेष्ठ श्रेष्ठ मंडळीस आमंत्रणेंही पाठविण्यांत आलीं आहेत परंतु या निवडानिवडींत विषाद वाटण्यासारखी गोष्ट अशी कळते कीं, इंदूरचे होळकर सरकार यांस वगळण्यांत आलें आहे. इंदूर सरकारावर इतराजी आहे ह्मणून हा प्रकार घडला असेल असें ह्मटलें तरी, काश्मीरचे महाराज, बडोद्याचे गायकवाड, ह्मैसूरचे महाराज, पतियालाचे युवराज व नेपाळचे महाराज यांस निमंत्रणें कां झालीं नाहींत हें समजत नाहीं. निमंत्रित संस्थानिकां पैकीं सर्वजण जातील असें नाहीं. आमच्या मतें या प्रसंगाला निदान निमंत्रणाचा प्रसाद मोठ्या दिलदारीनें वाटण्यांत यावा ह्मणजे इंडियन प्रजेला मोठा संतोष वाटेल.

वरील राज्याभिषेकाचा समारंभ झाल्यानंतर तन्निमित्त १९०३ सालच्या जानेवारीच्या १ ले तारखेला दिल्लीला मोठा टोलेजंग दरबार होणार आहे. पृथ्वीवरील विख्यात राष्ट्राला शोभणारा व वैभव सूचक असा हा दरबार आठवणींत राहण्या सारखा होणार आहे. या समारंभाला इंडियांतील सर्व समाजाचे अग्रेसर लोकांस बहु आदरानें सरकार बोलावील असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 11 1901

There is a sort of social anarchy in the relations that exist between the money—lenders and their debtors in this province. Usury has reached a bad stage in Berar. A hard competition has set in between these two portions of the people. The capitalist does his level best to have a fast grip of the opportunities of making hay over the weaknesses of the borrowing people. The need of the poor people forces them to draw upon their credit however low it may be. The result is that the poor people have come down to the lowest regions of starvation, poverty and degradation. These evils predominate in a striking manner in all agricultural provinces. Agriculture is not really so much a paying business as it has been considered for a series of centuries. Wealth in India lies almost in the raw products of agriculture. People have learnt to think agriculture as the main stay and the principal tube of sustenance and they have in fact no other resource left to them for levelihood. With this absorbing interest concentrated in agriculture, people as a whole stick to it as the proudest legacy of their forefathers. But agriculture does not satisfy the present demands upon it. It does not bring so much income as is needed for the ordinary comforts of the Indian people. It is further to be remembered that the Indian standard of living is on the minimum scale when we compare it with that of the other civilized nations in the west. Thus we see that our people waste their energy and lose their lives over agriculture but they run through the course of their lives without sufficient meals and without a margin of profit as a fund for some future provision of the family. Our people have hardly the time to think beyond to-day. There is no thought of the morrow in their programme of life. People have no state at stake and live a hard life from one day to another. In this state of affairs it is but natural that their credit should be low in the market and in their hands their property should not carry even 50 per cent of its net value because they have not got the tact and the prudence to secure its proper value. The ignorance of the people is amazing. They imprudently fall in debts and one false step leads them into another and the result is that the past mistakes have aggravated the miseries of indebtedness in an immense measure. The people who borrow and make up their wants of to-day by exhausting their credit for ever have come to be a prey in the hands of their shy-lock. The money—lender has his excellent opportunities and we see now that a small portion prospers upon the destruction and degradation of the rest of the population. Thus the present relation between the money—lending people and their debtors is most subversive of social amity and is likely to threaten the very continuance of the old social fabric of which the masses of the people form the major portion. We feel that the English principles of equality, freedom of contract and the competitive tendencies of the modern times have upset the harmony of the people and there is a sort of gnawing into their vitals that is sure to bring us to a state the evil prospects of which we fail to foresee. We think that the time has come when it is imperative that there should be some legislation to control the full play of the present law of interest and to introduce a salutary check to improve the well—being of the people.

---

## वऱ्हाड

**सुट्टी--** दिवाळीचा उत्सव अंशतः या आठवड्यांत होता पण कामाच्या सोयीसाठीं आजचा अंक काढून घेतला आणि पुढील सोमवारचा ह्मणजे १८।११।०१ चा अंक प्रसिद्ध करण्यांत येणार नाहीं आह्मांस ही वार्षिक सुटी मनोभावानें आमचे वाचक देतीलच आणि आह्मीही त्यांचें अभिनंदन करून त्यास सर्व सुखसंपदा लाभाव्या ह्मणून परमेश्वरा जवळ प्रेमपूर्वक विनंती करितों.

मे० कुमार श्री हरभामजी डिपुटी कमिशनर, आकोला हे दिवाळीच्या सुटींत काठेवाडास जाऊन परत आल्यावर पुन्हां दवऱ्यावर जातील. तारीख १८ नोवेंबर पासून २४ तारखेपर्यंत मुक्काम आकोटास होणार असून साहेब बहादूर २५ तारखेला नरनाला किल्ला पाहण्यासाठीं जाणार आहेत.

रा. रा. सी. शामराव अध्याची, यांची बदली बुलढाण्याहून झाल्यामुळें ते आपल्या बदलीच्या जागीं उमरावतीस दाखल झाले.

मि. आर. ए. डब्ल्यू स्विनरटन एक्झिक्युटिव्ह एंजिनिअर वर्ग १, हे आकोल्यास सस्पेंड होते आतां त्यांची चाकरी सरकारला या पुढें नको असा हुकूम इंडिया सरकारानें प्रसिद्ध केला आहे हें कळविण्यास दुःख वाटतें.

तारीख ९ नोवेंबर हा दिवस चक्रवर्ती बादशहा एडवर्ड यांची जन्मतीथ असल्या कारणानें गेला शनिवार हा दिवस मोठ्या आनंदाचा समजून सर्वत्र सरकारी कचेऱ्या वगैरे बंद ठेवण्यात आल्या होत्या.

गेल्या लोअर हायर परीक्षेंत ३० गृहस्थ निरनिराळ्या विषयांत पसार झाले आहेत पण त्या पैकीं खालील गृहस्थ मागील परीक्षांच्या गोळाबेरजेनें संपूर्ण परीक्षेंत उतरले आहेत:—

| | |
|---|---|
| मि. ए. डी. सी. बार असि. कामिशनर. | हायर परीक्षा |
| ,, सोराबजी शापूरजी, तहशिलदार. | ,, |
| रा. रा. त्रिंबक नारायण तारे.<br>,, शिवराम मोरेश्वर.<br>,, रामचंद्र नारायण साठे. | क्लार्क ऑफ कोर्टाची व तहशिलदारीची परीक्षा |
| रा. रा. बाळाजी रामचंद्र<br>,, निळकंठ गोविंद<br>,, बाळिराम त्रिंबक | दिपुटी क्लार्क व नायब तहशिदारीची परीक्षा |

गेल्या आगष्ट महिन्यांत ८८१८ माणसें मरण पावलीं व ९४८२ जन्मलीं. या आंकड्या वरून सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे असें दिसतें.

## नोटिशीचें उत्तर

नोटीस वेशपी सदोबा वल्लद बाबना कोमटी मुक्काम आंजी नारसिंव्हांची तालुके केळापूर जिल्हा वणी यासः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपण वऱ्हाडसमाचार पत्रांतून तारीख १४ आक्टोबर १९०१ इसवीच्या अंकांत जी नोटीस दिली ती पाहतां सदरहू नोटीशींत माझे इष्टेटीवर तुह्मी आपला हक्क शाबीत करण्याबद्दल जो मजकूर लिहिला तो अगदीं खोटा आहे. तुमचे तीर्थरूप जीवंत असतांच तुह्मा दोघां बंधूंचे हिश्शाबद्दल निकाल झाला आणि तुमचे तीर्थरूपाजवळ जिनगी अगर उपजीविकेचें कांहींच साधन नव्हतें सबब तुह्मी वडिलास सोडून आपल्या उदर भरणार्थ दुसरीकडे उद्योगास लागले तेव्हां ह्यातारपणाची दैना न व्हावी अशा हेतूनें पुत्र धर्मास अनुसरून माझे नवऱ्यानें ह्मणजे आपले बंधूनें वडिलाचा चरितार्थ चालविला व स्वतःच्या उद्योगानें जिनगी जमविली. असे कोणीहि पंच लोक सांगतील सबब माझे नवऱ्यानें स्वकष्टानें संपादिलेल्या इष्टेटीवर तुमचा कोणत्याच प्रकारें हक्क पोहचत नाहीं. खरोखर पाहिले असतां वडिलांचा चरितार्थ दोघांनीं चालवावा तो माझे नवऱ्यानें एकट्यानें चालविला. वडिलांचे मरणा पर्यंतचा खर्च तुमचे जवळून मात्र मला घेणे इष्ट आहे. असे असतां तोंही मी मागितला नाहीं परंतु अशा आपल्या कृत्यावरून तो खर्च घेणे मला भाग पडेल. रोजगारपाण्याच्या संबंधानें माझे नवऱ्यावर बरेंच कर्ज झालें होतें व पुढें नवरा वारल्यावर मी आपणास सूचना ही केली होती कीं आपली जिनगी वगैरे संभाळून कर्जाची फेड करा तेव्हां कर्जाचा बोजा पाहून आपण ती गोष्ट नाकबूल केली. त्या प्रमाणें मी निराश होऊन चार चवघां कर्जदारांचे पायींपोटीं लागून बहुतेक कर्जाचा बोजा उतरविला व बेतानें वागून जिनगी कायम राखिली सबब आतां तुह्मी माझे जिनगीस कोणतेही प्रकारे पात्र नाहीं हें आपणास कळावें ता० ६।११।१९०१ इसवी.

सहीची निशाणी

राजू मर्द जागोबा चेलमेलवार
मुकाम आंजी नारसिंह तालुके
केळापूर जिल्हा वणी.

---

किरकोळ दिवाणी मुकदमा नंबर ३/१९०१

विद्यमान डेपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे अकोले यांचे कोर्टांत.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, येडाप्पा वल्लद जानाप्पा वाणी लिंगाईत राजूरकर राहणार मोरगांव साद्दीजन तालुके बाळापूर जिल्हे अकोले याचे मोरगांव साद्दीजन येथील शेत सर्वे नंबर ४ एकर गुंठे ६८३२ आकार रुपये १०८१० यांतील $\frac{1}{2}$ हिस्सा वाटलेला पाश्चिम भागाकडील आहे त्याचे प्रोबेट सरटिफीकिट कायद्या प्रमाणें मिळण्याकरितां सदाशीव आप्पा वल्लद बसाप्पा वाणी गटुळे अज्ञान पालन करणार मातोश्री सावित्री मर्द बसाप्पा वाणी गटुळे राहणार पेठ बाळापूर तालुके बाळापूर जिल्हे अकोल याने, त्याजला मयतानें तारीख २७ माहे मे सन १८९९ इसवी रोजीं करून दिलेल्या अखेरचे मृत्युपत्रावरून आमचेकडेस अर्ज दिला आहे तो किरकोळ दि० मु० नंबर ३ सन १९०१ चा फैल होऊन त्याची चौकशीची तारीख १० माहे दिसेंबर सन १९०१ इ. ची आहे. तरी सदरहू येडाप्पा वल्लद जानाप्पा वाणी याचे सदरहू जिनगीवर ज्या ज्या लोकांचा हक्क संबंध असेल त्यांनीं आपले हक्क संबंध दाखविण्याकरितां सदरहू तारीख १०।१२।१९०१ इसवी रोजी दिवसा १० वाजतां आमचे कचरीत अकोले येथें अगर आमची स्वारी जेथें असेल तेथें हाजर होऊन दाखवावेत. तसे न केल्यास त्यापुढें कोणाची कोणत्याहि प्रकारची तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावे, तारीख ४।११।१९०१ इसवी.

HARBHAMJI
दिपुटी कमिशनर
जिल्हे अकोले.

---

# वर्तमानसार

—०—

जाळणारा चमत्कारिक वृक्ष— हें झाड ब्रह्मदेशांत आहे. यास एक प्रकारचा चमत्कारिक वास येतो. याच्या जवळ कोणीहि प्राणी स्वभावतःच जात नाहीं. याच्या पानास स्पर्श झाला कीं तप्त लोखंडानें भाजल्या सारख्या वेदना होतात. यावर कांहीं उपाय चालत नाहीं. मनुष्य वा जनावर या झाडाच्या स्पर्शानें वेडावून व वैतागून जातो. व सैरावैरा तडफड करितो. हें दुःख बरेंच महिने व कधीं कधीं वर्ष दोन वर्षेंहि राहतें. हा वृक्ष ७९ फूट उंच वाढतो व तो जसजसा मोठा होतो तस तशी त्यापासून भिती कमी असते. हा ह्या झाडांत काय गुणधर्म आहे याचा शोध लागला पाहिजे.

पोलिसची मर्दुमकी—पोलीस लोक हे गरिबाचे काळ पुरुष होत व ऐन आणीबाणीचे समयीं तें शेंपटी खालीं करून पळून जातात असा सार्वत्रिक समज आहे. पण वायव्य प्रांताकडील पोलीसनें एक हिंम्याची गोष्ट केली आहे ती अशीः—जन्मठेपेचे तीन कैदी आगगाडींतून नेत असतां त्यांनीं आपल्या हातकड्या तोडल्या व ते गाडी भर वेगांत असतांच खालीं उड्या टोकून पळाले. त्यांच्या मागोमागच दोन पोलीस शिपायांनीं गाडीखालीं उड्या घातल्या व दोन कैद्यांस ठार केलें व एकास पकडलें. शिपायांसहि दुःखापत झाली. ह्या त्यांच्या शौर्याबद्दल बक्षिस देण्यासाठीं सरकारकडे शिफारस झाली आहे. अशा कृत्यांची योग्य संभावना होणें वाजवीच होय.

पदवीदान व योग्य सन्मान— श्रीमत् जगद्गुरु श्री शंकराचार्य मठ द्वारका याजकडून वेदशास्त्र संपन्न रा. रा. काशिनाथ वामन शास्त्री लेले यास 'श्रौतस्मार्तधर्ममार्तंड' अशी बहुमानाची पदवी देण्यांत आली आहे याबद्दल आह्मी मोठ्या आनंदानें शास्त्रीबावांचें अभिनंदन करतों. या पदवीदानानें शास्त्रीबोवांची खरी योग्यता आणि श्रीमत् जगद्गुरूंची गुणग्राहकता या दोन्ही गोष्टी चांगल्या व्यक्त होतात यांत संशय नाहीं.

छत्रीचा विमा—उतरणारी एक कंपनी विलायतेस आहे. छत्री सांडली किंवा नाहींशी झाली कीं तिची किंमत भरून मिळते. या कंपनीस किती वर्षें किती कमिशन द्यावें लागतें कोण जाणें! आळशी व बावळट लोकांना ही सोय चांगली आहे.

चोरास आमंत्रण— नाण्यावर पूर्वीं अनेक प्रकारचे छाप असत. सेंट नाण्यावर 'आपल्या कामाकडे लक्ष्य दे' असा छाप होता. छापा करवीं सुबोध वचनें लोकांस शिकविणें कांहीं वाईट नाहीं. उत्तर हिंदुस्थानातील नाण्यावर 'मला चोरूं नको' असा छाप असे आणि त्या नाण्याच्या ह्या अशा ओरडण्यामुळेंच चोरांस अचूक जाऊन त्यांस पकडतां येत असे; ह्मणूनच कीं काय हल्लींच्या रुपयांचे तें भितीनें ओरडणें बंद झालें व ते आतां गुपचिप तिजोरींत जाऊन बसतात.

मातोश्रीची महती—अफगाणिस्थानचे पादशहा आपल्या आईची सल्लामसलत घेऊन राज्यकारभार करीत असतात अशी बोलवा आहे. राजकारणांत स्त्रियांचा हात बराच हातखंडा असतो, किंबहुना त्या पुरुषांपेक्षांहि एखादे कांकणभर जास्तच धोरणी असतात असा अनुभव आहे. तशांत प्रत्यक्ष मातोश्री आपल्या मुलास जो हित बोधाचा अमोल धडा देईल त्याची महती काय सांगावी! सद्गुणी आईचें शिक्षण ज्या मुलास लाभलें असेल तो खरा भाग्यवंत पुरुष होय, आणि जो मातृसमागमसुखास अंतरला तो खरा हतभागी होय. नेपोलियनासारख्या वीर पुरुषानीं आपल्या आई या उदरीं येऊन त्यांस धन्य केलें, तद्वत् सर्व सुपुत्रांनीं आपल्या सत्कृत्यांनीं आईस कृतकृत्य करावें व आपल्या दुर्वृत्तीनें त्यास शीण येऊं देऊं नये.

असें कां— याचा विचार करा. फ्रांस देशाची सारी पांच कोट प्रजा आहे पण ती सर्वांना थरारून सोडते. पण तीच हिंदुस्थानची तीस कोट प्रजा सर्वांपुढें चळचळ कांपते. याचें मुख्य इंगित असें आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांस पोटभर अन्न नाहीं, अंगभर वस्त्र नाहीं, गांवांत घर नाहीं, रानांत शेत उरलें नाहीं, अंगांत पाणी नाहीं, डोळ्यांत तेज नाहीं, मनगटांत जोर नाहीं, आणि शरीरांत जीव नाहीं. ते दुबळे, कंगाल व अनाथ झाले आहेत. त्यांची हिंमत खचली व त्यांचा भक्तीभाव नष्ट झाला आहे. पण त्यांना सरकार जर ममत्वानें आपल्या पाठीशीं घालील. व पोटाशीं धरील तर त्यांच्या कडे वाकड्या नजरेनें पाहण्यास कोण धजणार आहे? तर असें गाफीलपणांत आपलें आयुष्य दवडूं नका, सरकार सुप्रसन्न करून घ्या.

राज पुरुषां वरील अरिष्टें—थोर पदारूढ पुरुष नेहमीं जीवितसंशयांत असतात. त्यांस सर्वांस खूष असें कधींहि करितां येणार नाहीं. हजारों लोकांची मर्जी किंवा गैरमर्जी हीं त्या अधिकाराच्या अंगभूतच उत्पन्न होत असतात. व त्याच्या बऱ्या वाईट परिणामास सादरच असावें लागतें.

पर्शियाच्या शहास ठार करण्याचा एक गुप्त कट झाला होता तो बाहेर फुटला व त्याच्या जीवा वरील संकट टळलें. ह्या कटांत त्याचा वजीर, त्याचे बंधू व जामात हे मुख्य चालक होते व त्यांस हद्दपार करण्यांत आलें आहे. शहा हे फार उधळे आहेत ह्मणून त्यांचे संबंधीं सर्व प्रजा फार नाखूष आहे ह्मणतात.

भोरच्या पंतसचिवावरही एक अरिष्ट आलें होतें. भर कचेरी दरबारांत पंतसचिवाच्या मानेवर एका मुसलमानानें हात टाकला होता. पण तात्काळ त्यास चतुर्भुज करण्यांत आलें. बेताल, दांडगी, व जीवाची ज्यास पर्वा नाहीं असे लोक राजपुरुषांचा खून करण्या सारखें अचाट व साहसीकृत्य करण्यांत मोठें कृतकृत्य समजतात व अशा बेफाम लोकां पासूनच छत्रपतींना फार भिती असते. राज्याच्या घडामोडींत हजारों विघ्नें दत्त ह्मणून उभींच असतात सबब सत्ता वापरणाऱ्या लोकांनीं नेहमीं डोळ्यांत तेल घालून सावधपणें राहिलें पाहिजे. व या बरोबरच लोकांच्या मनांत आपल्या विषयीं दुष्टबुद्धि कां येते याचाहि पण विचार त्यांनीं करण्यास चुकूं नये.

प्रचंड भुजंग— सिंगापूर बेटांतून कांहीं फिरस्त्यांनीं एक सर्प धरून आणला आहे. तो साप २७ फूट लांब व दोन फूट जाड आहे. त्याचे अंगावर चित्रविचित्र पट्टे आहेत. हा महाभुजंग त्या फिरस्त्या जवळ असल्यामुळें सर्वांसच पाहण्यास सांपडेल.

उत्तम विचार आहे— मद्रासकडे उत्तम बांबू होत असतात, त्यांचें बुरुड काम चांगलें होईल ह्मणून तिकडील लोक बुरुडांना शिकवून तें काम सुरू करण्याचा एक कारखाना काढणार आहेत. हरएक उद्योग धंद्याची अभिवृद्धि करण्याकडे लोकांचें लक्ष लागत चाललें आहे ही समाधानाची गोष्ट होय. सर्व गोष्टी श्रमसाध्य आहेत हें विसरतां कामा नये.

शेतकऱ्यास फार उपयोगी गोष्ट— शेतांत टोळ फार झाले असल्यास चारी बाजूंनीं रात्रौ शेकाटे करावेत ह्मणजे ते टोळ विस्तवाच्या उजेडाकडे पतंगा प्रमाणें धांव मारतात व आपोआपच त्या अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडून त्यांचा उपद्रव दूर होतो. याचा अनुभव आइन घेऊन पहावा.

राजद्रोह— पुष्कळ आयरिश लोक हे इंग्रजास पाण्यांत पहातात त्यांचें वर्चस्व व बढती हीं त्यांच्या डोळ्यांत खुपते. ते भरसभेंत राजद्रोही भाषणें करितात पण त्यांचें कांहीं इतकेंहि वाकडें होत नाहीं. असो. पण आमच्या सारखे राजनिष्ट लोक व राष्ट्रीय सभे सारख्या राजहितकारणी संस्था सरकारास वावड्या कां वाटतात बरें! जबरदस्ताच्या वाटेस कोणी जात नाहीं हेंच खरें. कांहींहि असो. ब्रिटिश साम्राज्य चिरस्थाई व सुखी नांदण्यास त्यांतील सर्व प्रजेचा एकादिल व एकी असली पाहिजे व अंतस्थ द्वेषबुद्धि व वितुष्टें याचा शिरकाव होतां कामा नये.

( पुरवणी पहा )

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ....................................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ८६
दुसरे खेपेस .... ........८१

Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ................................ 4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR

VOL XXXV AKOLA MONDAY 25 NOVEMBER 1901 NO 45

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २५ माहे नोव्हेंबर सन १९०१ इ० अंक ४५

## मोरोपंताच्या स्त्रीजातीविषयीं उदात्त कल्पना.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा० न० वि० वि० आपल्या तारीख ४ व ११ नोव्हेंबरच्या दुहेरी अंकांत रा० काळेले यांच्या व्याख्याना नंतर रा० काणे यांनीं केलेल्या भाषणाचा सारांश दिला आहे. रा० काणे यांची मार्मिकता पाहून आनंद झाला. पंतांनीं 'आपला हृदयस्थ सगळा उदारपणा व प्रेमाचा संचय' जींत ओतला आहे अशी 'मी जरि अशक्त निर्धन' ही आर्या त्यांनीं मोठ्या सहृदयपणें दिली आहे. पण 'हेचि करि प्रथम बोध या कार्या' या चरणाचा अर्थ 'काव्य करण्याकडे प्रवृत्ति होण्यास तिचें प्रोत्साहन कारण झालें' असा केला आहे, तो मात्र योग्य दिसत नाहीं. याचा अर्थ 'काशीयात्रा करण्यास तिनें मला प्रवृत्त केलें' असा पूर्वीच्या आर्येच्या संदर्भावरून स्पष्ट दिसतो. 'वदला प्रसन्न चित्तें साहित्य करून बंधु आबाजा' हा त्या आर्येतील पूर्वार्ध आहे. दोन्ही आर्या एकत्र घेतल्या ह्मणजे पंताच्या स्त्रीनें काशीयात्रा करण्यास त्यांस प्रवृत्त केलें व त्यांच्या कनिष्ट बंधूनें सर्व तयारी करून दिली एवढेंच सांगण्याचा पंतांचा हेतु उघड दिसतो. पंतांचें गयेहून आबाजी पंतास पत्र आलेलें सांपडलें आहे त्यावरूनही आबाजीपंत तेव्हां बारामतीसच होते असें दिसतें. अस्तु.

पंत आईबाप, इष्टमित्र, गुरुपुत्र, स्त्रीकन्या, यजमान इत्यादिकांविषयीं हर प्रसंगीं मोठें प्रेमळपणाचे उद्गार काढतात. त्यांनीं भागवतांत ह्मटलें आहेः—

'अमृताची प्रेमभाव ही खाणी'
—दशमस्कंध. आर्या ६०२

तसेंच नलदमयंत्याख्यानांतः—

दे दम्पती न डोळे व्यर्थ विना प्रेम
बोबळें चिपडे।
—वनपर्व अ. ४

(ज्या स्त्री पुरुषांत प्रेम नाहीं ते बुबुळावांचून असलेल्या चिपड्या डोळयांसारखे उद्वेग जनक आहेत) असे सरस उद्गार काढणाऱ्या रसिकवर्यानें रमाभार्येची भलेपणा बद्दल स्तुति करावी यांत आश्चर्य नाहीं.

विठोबा दादा चातुर्मासे ह्मणून पंताचे एक स्नेही मोठे सत्पुरुष होते. त्यांची विधवा बहीण बंधूच्या सहवासामुळें थोर अधिकारास पोंचली होती. तीवर पंतांची ही आर्या पहाः—

भवभय जायास्तव त्या नमितो मी
सर्व काळ जीजीतें।
बहु भूतदया हृदयीं रंकाची सर्व
काळजी जीतें ॥ १ ॥

जिजाबाई सारख्या अशिक्षित विधवा स्त्रीस अशुभ न मानता आपलें शुभ होण्यासाठीं पंतासारख्या महा कवीनें सर्व काळ नमावें यावरून त्यांची चित्तोन्नति स्पष्ट होते. बापूजी नाईकांच्या मुलींना व सूनांना जात्यावर बसून ह्मणतां यावें त ह्मणून पंतांनीं सोप्या ओवी वृत्तांत सीता, सावित्री व रुक्मिणी या महा साध्वींचीं चरित्रें तयार करून दिलीं, मदालसा सारख्या प्राचीन व जनाबाई, मुक्ताबाई, अहल्याबाई सारख्या अर्वाचीन सतींचीं स्तोत्रें गायिलीं, रामायण भारतांतून सीताद्रौपद्यादि सती विषयीं बोलतांना हमेष आदर पूर्वक उल्लेख केले; 'पतिव्रता कीर्तनांत' सुमारे पन्नास सतींस स्वोद्धाराविषयीं विनविलें यांवरून स्त्रियांविषयीं सन्मानपूर्वक त्यांची आदरबुद्धि किती होती हें स्पष्ट दिसतें 'पतिव्रता कीर्तनांत' अखेरीस पंत ह्मणतातः—

श्रीभगवज्जन जो जो जी जी त्याची
महासती भार्या।
तीस नमस्कार असो मजवरि ती बहु
दया करो आर्या ॥ ९० ॥

पंतांनीं आपल्या मुलींस व सुनांस लिहिण्या वाचण्यास शिकविलें होतें व त्यांची नातसून रघुकिरातादि काव्येंही पढली होती पंत एका पत्रांत ह्मणतातः—रामायण अभंग व रुक्मिणी स्वयंवर अभंग पाठविले आहेत. लिहून घेऊन लवकर पाठवावे. चिरंजीव सौभाग्यवती मुलींस वाचावयास पाहिजेत."

यावरून मोरोपंत समग्र स्त्रीजातीस किती मान देत, स्त्री शिक्षणाविषयीं त्यांच्या कल्पना व मार्ग कसे होते हें कळून येणार आहे. आमच्या समाजांत स्त्रियांस नीतिशिक्षण, धर्मशिक्षण व जरूरीचें गृहशिक्षण पूर्वींपासून मिळत आहे. पूर्वीं हिंदु कुलीन स्त्रियांचे विनयादि गुण रक्षून व बभ्रा केल्यावांचून त्यांत पंता सारखे कुलीन व सुशिक्षित लोक कशा तऱ्हेनें शिक्षण देत हेंही यावरून समजण्यासारखें आहे.

आणखी रा० काणे "अनलसमीहितसाधी' अशा प्रकारची आर्या तर त्यांच्या लक्षावधि पद्यांत एकच आहे" असें ह्मणतात पण अशी समुद्गक यमकाची दुसरी आर्या पहाः—

बहु मान सदा सांवरि, साधु. निका,
महित, सज्जन, वनौका।
बहु मानस दासांवरि, साधुनि कामहित
सज्ज नव नौका ॥ ३२
—नामरसायण.

या आर्येचा नीट निःसंदेह अर्थ लागल्यास कोणी मला कळवावा. हे विनंती.

पंढरपूर हाय कूल
ता. १७।११।१९०१

आपला,
लक्ष्मण रामचंद्र
नागारकर

---

(Communicated)

Ellichpur 19th. November 1901.

The opening ceremony of the "Ellichpur Recreation Lodge" was performed with great *eclat* last evening. A special shamianah was erected in the premisses of the building of the 'Lodge' which was decorated with buntings and flowers and illuminated with splendid lights. Invitation cards were issued to British Officers of the station and native gentlemen of the town, about 300 people having assembled to witness the ceremony. Major and Mrs. Horsbrugh and some of the Officers of the Regiment, located here, had graced the occasion by their presence.

The school boys first sang "God save the king" in marathi in accompaniment with harmonium. Mr. Ganesh Nagesh Pleader, Joint Vice—President of the 'Lodge' then opened the proceedings and read the following address:—

Mrs. Horsbrugh and Gentlemen,

I can not help feeling proud that it has fallen to my lot to open the proceedings and I request you to assist in starting the instituion, in the premisses of which we have met this evening. In the first place, I must cordially thank you for having graced this occasion by your presence. I need not tell yon the object for which we have all assembled here. A club called the "Ellichpur Recreation Lodge" has been established here and it has been proposed to have it formally declared open this evening. Before this is done, it would not be inappropriate if I give you a short history of the movement which has brought this institution into existence to-day.

In the early eighties there was a club in the house adjoning this compound where gentlemen used to meet daily for recreation purposes. For some reason or other, that club ceased to exist about 18 years ago & since then the want of an institution like the one which is going to have the honor of being formally opened, has been keenly felt. The matter was discussed and attempts were several times made by pleaders and other Indian gentlemen to start such an institution but the necessary funds could not be collected.

When our friend Mr. G. W. Bapat was here last year, he seemed to take a keen personal interest and give a stimulus to the idea but unfortunately that was a famine year and owing to the increased difficulties of collecting funds, the idea has to be given up. It was however destined that our wishes should be realized this year only and strange to say that all the difficulties disappeared at once and a sum of Rs 2000 was collected within a comparitively short time. This house, which I might observe is one of the few houses well suited for such a purpose, was secured for a comparitively small amount and we have also obtained a little furniture. A tennis-club has been attached and if funds permit, we propose to shortly purchase a Billiard Table. We have also obtained all the articles required for native in—door games and Mr. Bandu Nana Karkare who has taken a good deal of interest from the beginning, has prepared for us, a very nice ping pong table. Of course, a good deal still remains to be done, but a good beginning has been made and there is every reason to hope that the purpose for which the club has been started will be fully attained, if the members of the club continue to take as much interest as they have done in the past. After what has been said above, I do not think, it would be necessary for me to explain the object for which this institution is going to be started. The object is appearent from the very name which has been chosen viz "The Recreation Lodge." Every one knows by experience how happy one feels by a short recreation of some sort after the day's hard and monotonous work. According to our oriental ideas, we are some what averse to taking physical exercise and are more inclined to sedentary habits. One of the objects of the institution is to promote the interest taken in out—door games. Of course, there are many other advantages to be obtai[illegible] from institutions like these and among them may be included the development of mutual acquaintance and friendship, study and knowledge o different manners and customs and exchange of thoughts between member of various castes and pursuits. To-day the number of members of the club is 34 and it is true that the majority is of Brahmins but is must be explained that the institution is not to be confined to the Brahmins or any other special class, as will be apparent from the fact that the members have elected as their president Nabab Sayed Moinuddin Khan Assistant Commissioner, a gentleman who comes from one of the best Mahomedan families of the Deccan and that they shortly propose to request our popular Deputy Commissioner Major Horsbrugh to become a patron of the institution.

In fact the idea of meeting in clubs like these merely for purpose of recreation is not oriental. but it is one which we might usefully take up. If we look to the histories of Europe and America, we find that clubs play a very important part in the social and moral civilization of a nation. A reference to the "Hyzell's cyclopadic Record of men and topics of England" in 1893 shows that there were 109 clubs in England in 1893 rates of monthly subscription being 8 pounds or guinees and number of subscribers varying from 100 to 1000 in each club. The above figures show the importance and usefulness of clubs and the extent to which they have been utilized by the people of England.

Before closing this address I cannot help mentioning the name of Colonel K. J. L. Mackenzie our late and revered Deputy Commissioner, who though he retired as the Resident

for Hyderabad, continued to love the people of this District and kept their interest specially at heart all through his long and meritorious career. For the pleasant scenery of our Mall, for the number of our lofty and beautiful tees in the station, & even for the excellent sight of the place where we are starting this institution we are deeply indebted to Colonel Mackenzie and we are doubly glad to note that our present Deputy Commissioner Major Horsbrugh is following closely in the foot—steps of his father-in-law. It is indeed, a happy and curious coincidence that the lady who has so greatly obliged us to-day by consenting to open our Lodge happens to be his daughter.

Ladies, and gentlemen let me apologise for having detained you so long, and now I ask our President to request Mrs. Horsbrugh to kindly declare the Lodge opened. Wishing a long and prosperous career to this institution and again thanking you all for having attended this evening, I beg to close.

---

Mr. Moinuddin Khan, Senior Assistant Commissioner and President of the Lodge, then requested Mrs. Horsbrugh to open the 'Lodge' with silver key specially prepared for the occasion. Mrs Horsbrugh opened the lodge and entered the halls followed by Major Horbrugh and other officers present. The halls were beautifully furnished and illuminated with lights. After inspecting the building, the party returned to the "Shamianah." Several items of the programme were then gone through by school-boys with great tact and skill which were much appreciated by the officers and the people assembled. Major Horsbrugh addressed the assembly in short and sweet words suitable to the occasion. Garlands of flowers, atter and PanSupari were then distributed and the proceedings were brought to a close with three cheers to Major Horsbrugh Deputy Commissioner of the District. Sweetmeats were distributed to the school-children in honor of the occasion.

Yours truly
X

# वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक शुद्ध १४ शके १८२३

## अभिनंदन.

चक्रवर्ती बादशहा एडवर्ड साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त गेली नोवेंबरची ९ तारीख शुभ दिना प्रमाणें सर्वत्र पाळण्यांत आली या दिवशीं सरकारी कचेऱ्या बंद होत्या आणि नव्या बादशहाचा वाढदिवस ह्मणून मोठ्या प्रेमोत्साहानें आनंदांत घालविण्यांत आला. पूर्वं काळीं बादशहा उत्कृष्ट कामगिरीबद्दल चांगलीं चांगलीं मूल्यवान बक्षिसें देत आणि या रीतीनें उत्तम उत्तम गृहस्थांचें अभिनंदन करित असत. प्रस्तुत काळीं ही गुणग्राहकता पदवीदानाच्या द्वारें दर्शविण्यांत येत असते. वाढदिवसाच्या निमित्तानें बहुमानदर्शक किताब, श्रेष्ट पदवी किंवा सोनेरी रुपेरी चांद हीं प्रांतवारीनें वाटण्यांत आलीं. वरील प्रकारें सरकारांनीं आमच्या प्रांतांतील चार गृहस्थांचा बहुमान केला आहे. चौघेही सरकारी अधिकारी आहेत. ज्यांचीं नावें सरकारच्या निदर्शनास आणिलीं आहेत ते सर्व गृहस्थ आपापल्या पदवीच्या मानमान्यतेला विशेष पात्र आहेत या विषयीं मतभेदच नाहीं. पण वऱ्हाडांत पदवीदानाच्या पात्रतं संबंधीं निवडा निवड होतांना पुष्कळसा प्रकार आंधळ्या कोशींबिरीच्या खेळांतल्या प्रमाणें होतो ही असमाधानाची गोष्ट आहे.

ज्या चार सद्गृहस्थां विषयीं सरकारांनीं मुग्ध गुणगीत ह्मटलें आहे त्यांचें आह्मी मनापासून अभिनंदन करितों. पहिले गृहस्थ ह्मणजे मे. एफ. डब्ल्यू. ए. प्रीडो साहेब हे होत. हे हल्लीं वाशिम जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर आहेत. पहिल्या दुष्काळाच्या वेळीं यांनीं या जिल्ह्यांत जी उत्कृष्ट लोकसेवा केली ती सर्वांच्या ध्यानांत असेलच. वाशिम जिल्ह्यांत यांनीं शेवटच्या दुष्काळांत जिवापाड मेहनत केली आणि आपल्या शक्ती प्रमाणें सर्व जणांस चांगली मदत केली. अलिकडे ते फार कडक झाले आहेत असें ह्मणतात, पण हा दोष त्यांचा नसून त्यांच्या चांगुलपणाचा ज्यांस लाभ करून घेतां आला नाहीं त्यांचा होय. अधिकाराला कडक अंमला शिवाय शोभाच येत नाहीं आणि अधिकारच दया करण्याचीं स्थळें पुनीत करितो हें विसरतां कामा नये. मे० प्रीडो साहेबांस 'केसर-हिंद' चा रुप्याचा चांद जसा देण्यांत आला तसाच क्याप्टन टी. सी. फ्लौडन असिस्टंट कमिशनर यांसही देण्यात आला आहे.

'खान बहादूर' हा किताब वाशिमचे तहशिलदार मि० शेरमहमद खान यांस देण्यांत आला आहे. हे गृहस्थ महमदी धर्माचे अनुयायी आहेत तथापि हिंदूशीं व मुसलमानांशीं त्यांचें वर्तन अगदीं सख्यत्वाचें व समतोलपणाचें असतें. लष्करी खात्यांतून यांस पेनशन मिळत असतें. यांचा बाणा लष्करी धर्तीचा आहे. अर्थात् स्वभावानें सरळ, प्रामाणिक, व करारी आहेत. कर्नल मेकंझी साहेबांच्या आमदानींत यांस तहशिलदारी मिळाली. थोड्याच कालांत हे आपल्या कार्यबाहुल्यांत अगदीं निष्णात झाले. गेल्या दोन्ही दुष्काळांत यांची कामगिरी रयतेला फार आवडली. शाळाखात्याच्या विद्यादानाकडे यांची दृष्टी विशेष आहे. वाशिमास औद्योगिक शिक्षणाची योजना यांच्याच श्रमानें झाली असून त्या कामानिमित्त वर्गणी गोळा करण्याचें काम यांनीं चांगलें चालविलें आहे.

रा. रा. नारायणसिंग बभूतसिंग आफिशिएटींग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, मेहकर यांस 'राव साहेब' ही पदवी देण्यांत आली आहे. हे आपल्या हिंमतीनें, आजवानें व कौशल्यानें एवढ्या मोठ्या अधिकाराला चढले आहेत यांचें लक्ष्य स्त्रीशिक्षणाकडे विशेष आहे. हे आपल्या अधिकाराला संभाळून लोकप्रीतीही संपादून आहेत. यांच्या कामगिरीची वाखाणणी सरकारानें पदवीदानानें केली ही संतोषाची गोष्ट होय.

## मुनिसिपल कारभार

वऱ्हाड प्रांतांत एकंदर बारा मुनिसिपालिट्या आहेत, त्यांपैकीं सहा संस्थांस आपले तीन--चतुर्थांश सभासद निवडण्याची परवानगी दिली आहे. बाकीच्या सहा संस्थांचे सभासद सर्वच सरकारांतून नेमिले जातात १९००--०१ सालचा वार्षिक रिपोर्ट मे० इलियट साहेबांनीं लिहिला आहे आणि तो नुकताच अलिशान रेसिडेंट साहेबांच्या अभिप्रायासह प्रसिद्ध झाला आहे. या रिपोर्टावरून मुनिसिपल कारभार चांगलासा समाधानकारक नाहीं असें दिसून येईल. मे. इलियट साहेब ह्मणतात कीं, मुनिसिपल संस्था संबंधानें लोकांस आस्था नाहीं. कमिशनर साहेबांचा अनुवाद अलिशान रेसिडेंट साहेबांनीं जोरदारपणें केला आहे; ह्मणून आह्मी खात्रीपूर्वक कळवितों कीं ही गोष्ट वस्तुस्थितीस सोडून आहे. सरकारी अभिप्रायाला मुख्य आधारभूत कारण ह्मटलें ह्मणजे निवडणुकीच्या वेळीं ६०८१ मतदारांपैकीं फक्त ७९२ गृहस्थ आपलीं मतें नोंदण्यासाठीं गेले होते हें होय. निवडणुकीच्या वेळीं मोठीशी चळवळ झाली नाहीं याचा अर्थ दुहेरी होतो. सभासद होऊं इच्छिणारे उमेदवार लोकांच्या विश्वासाचे असतात. त्यांच्यापैकीं कोणताही गृहस्थ निवडून आला तरी हरकत नसते. अशा प्रसंगीं मताधिकारी लोक फारशी गडबड करीत नाहींत. त्याज्य व ग्राह्य असे दोन विरोधी प्रकार नसल्यामुळें जी निवड होईल ती यथायोग्यच आहे ह्मणून मतें नोंदण्याच्या खटाटोपांत पुष्कळजण पडत नाहींत. तेव्हां वास्तविक निवडणुकीची धांदल उडाली नाहीं याचा अर्थ लोकांस मुनिसिपल संस्थे विषयीं काळजी नाहीं असा होत नाहीं.

कालान्तरानें मुनसिपल कारभाराचें स्वरूप पालटलें आहे. पूर्वींचा मानपान काहीं राहिला नाहीं, कामाचा बोजा मात्र मोठा आहे. या सार्वजनिक मुनिसिपल कामांत बहुत वर्षें ज्यांनीं खर्चलीं त्यास रावसाहेब किंवा राव बहादुर हा किताब देखील सरकार सढळपणानें देत नाहीं. मुनसिपालिटी ह्मणजे सरकार समजतें कीं आपला बोजा हलका करणारी व सरकारी खर्च कमी करणारी अशी एक संस्था आहे. सरकार मुनिसिपालिटीवर वाटेल तितके खर्च हवेतसे लादीत आहे आणि असा खर्च भागविण्या साठीं लोकांच्याच हातून नाना कर वसवीत आहे. मुनिसिपल संस्थेचा फायदा सरकाराला जसा होतो तसा लोकांस होत नाहीं. खर्चाचीं तोंडें मिळवितांनाच मुनिसिपल सभासदांस मोठा त्रास होतो आणि हळूं हळूं लोकांवर कराचा बोजा वाढतच असतो. असा खरा प्रकार आहे आणि त्यामुळें या सार्वजनिक कार्यासाठीं पुष्कळसे सुखवस्तु लोक पुढें येत नाहींत आणि हा दोष लोकांचा नसून सरकाराचा आहे. लोकांच्या हातांत मुनिसिपल सत्ता काहींच ठेविलेली नसते. आणि कामाचा बोजा मात्र लोकांस फुकट उचलावा लागतो.

मुनिसिपालिट्यांचें उत्पन्न फार वाढलें आहे आणि याचा अर्थ इतकाच कीं लोकांवर कराचा आकार वाढला आहे. १८९९-०० सालीं एकंदर उत्पन्न रुपये २,१९,७७३-१ आणा ९ पै होतें. तेंच उत्पन्न रिपोर्टाच्या वर्षीं रु. २,७१,८१६ १२-२ पै इतकें वाढलें आहे. खामगांवास जागाभाडें, आकोल्यास घरपट्टी वगैरे बाबींनीं हें उत्पन्न वाढलें आहे. लोकवस्तीच्या मानानें मुनिसिपल कराचा बोजा निरनिराळ्या गावीं भिन्न भिन्न प्रमाणांवर आढळतो. उमरावती शहरांत दर माणशीं १९ आणे ९ पै मुनिसिपल करांची सरासरी येते आणि सर्वांत कमी प्रमाण ह्मणजे शेगांवास दर माणशीं ३ आणे ६ पै पडतात एकंदर खर्च रुपये २९८८२०-आणे ९ पै ९ आहे. मुनिसिपल हद्दींत धर्मादाय अन्नछत्रें वगैरे गेल्या दुष्काळांत ठेवण्यांत आलीं होतीं त्यांचा खर्च एकंदर ३४३०९ रुपये झाला.

मुनिसिपल कारभारांत ज्या गृहस्थांची कामगिरी सरकारास विशेष पसंत पडली आहे त्यांची नामावळी आह्मी मुद्दाम खालीं देत आहों:—

| गांव. | मिस्टर. |
| --- | --- |
| आकोला— | विष्णु मोरेश्वर महाजनी. |
| खामगांव— | क्राफर्ड. |
| शेगांव— | रिच, मेहता व पतकी. |
| आकोट— | गब्बूसिंग. |
| इलिचपूर वगैरे— | बापूराव पेंडसे, व गणेश नागेश. |
| बुलढाणा— | श्रीधर रंगनाथ शेंबेकर. |
| वाशिम— | परांजपे व चार्लस. |
| यवतमाळ— | मुंडले व सस्तीकर. |
| उमरावती— | गणेश श्रीकृष्ण खापर्डे |

## शेती

आनंदाची गोष्ट आहे कीं अलिकडे बरेच लोकांचें लक्ष्य शेतीकडे लागलें आहे. तरी शास्त्रीय पद्धतीनें आणि मोठ्या प्रमाणावर शेतीचा धंदा करण्याकडे कल्पक, धाडशी व श्रीमंत लोकांचें लक्ष्य लागलें नाहीं. पैसेवाले लोक आज काल गिरण्याकडे धांव घेत आहेत. पहावें तेथें कापसाची सरकी काढण्याच्या व कापुस दाबून गांठी बांधण्याच्या गिरण्या काढण्यांत श्रीमंत लोक आपले भांडवल गुंतवीत आहेत. ह्या मार्गानें जाऊन त्या धंद्याची माती करण्याच्या आपल्या नेहमींच्या स्वभावा प्रमाणें हें होत आहे. शेतीकडे लक्ष्य लागल्यास हाही धंदा अब्रूचा व फायदेशीर

आहे. शेतीपासून मिळालेली संपत्ती दुसऱ्याची कमी न होतां मिळते. दुसरे धंद्याची गोष्ट अशी नाहीं. उदाहरणार्थ वकिली, हींत पक्षकाराचे घरांतून वकिलाचें घरात; वैद्यकी, हींत रोग्याचे घरांतून वैद्यांचे घरांत; सावकारी, हींत कुळांचे घरांतून सावकाराचे घरांत; ह्या प्रमाणें अदलाबदल होते. ह्या पेक्षां शेतीचा धंदा जास्त चांगला. हींत कोणाची संपती कमी न होतां आपणास मिळते. कोणाशी वांकडे होण्याचें कारण नसतें. आपले हाताखालीं माणसें असतात त्यांस चांगले रीतीनें वागवून त्यांचेवर उपकार करण्यास सांपडतें. व्यायाम होऊन प्रकृति चांगली रहाते. मनुष्य नोकरीची जितकी काळजी करितो, तितकी तो शेतीची करील तर त्यास कधीं कमी पडणार नाहीं. असें असता शेतकरी वर्ग नेहमीं आपत्तींत असतो ह्याचें कारण काय? असें कोणी विचारील तर त्याचें कारण त्याचा आळस आणि उधळेपणा हें आहे. शेतकऱ्याजवळ पैसा आल्याबरोबर तो बेसुमार खर्च करितो व आपत्तीचे वेळीं अडचणींत पडतो. भारी व्याजानें कर्ज काढून शेवटीं सर्वस्वी बुडतो. शेतकऱ्यानें ह्या करितां पुढील दोन सालें दुष्काळाचीं आहेत असें समजून आपला संसार चालविला पाहिजे.

मोठाले भांडवलवाले लोकांस शेतींत काय करितां येईल हें सांगण्याचें आहे. हल्लीं वणी व वाशीम जिल्ह्यांत पडीत जमिनी पुष्कळ आहेत. तेथें चराईच्या जागा पुष्कळ आहेत तरी अशा पैकीं सोयीची जागा पाहून तेथें मोठ्या प्रमाणावर शेती करावी. पैनगंगा नदीस मोठाले डोहो आहेत. त्यांतील पाणी वाफेचे यंत्रानें वर घेऊन बागाईत होण्यासारख्या जागा आहेत. अशा ठिकाणीं पाऊस कमी झाला तरी शेती बुडण्याची भीति नाहीं. चराईची सोय असल्यामुळें गाई, म्हशी व घोड्या ह्यांचीं खिल्लारें व शेळ्या मेंढ्यांचे कळप ठेवून मोठा फायदा होईल. सरकारचे लष्करी खात्याकरितां नेहमीं खेचरांची जरूरी असते व त्यांस किंमतही चांगली येते. तरी खेचरें पैदा करण्याचा प्रयत्न फार फायदेशीर होईल. ह्या गोष्टींचा विचार होऊन कोणी सामायिक भांडवलाची कंपनी उभारल्यास ह्या भांडवलास चांगली किफायत होईल. वाशिम जिल्ह्यापैकीं पुसद व मंगरूळ तालुक्यापैकीं पडीत जमिनीबद्दल कोणास माहिती पाहिजे असल्यास ती कोठें मिळेल वगैरेबद्दल ह्याचा लेखक आनंदानें कळवील. ह्याबद्दल पत्रव्यवहार करणें झाल्यास वऱ्हाडसमाचार छापखान्याचे मालकाशी करावा. इतर वर्तमानपत्रकर्त्यांनीं ह्याचा उतारा घेऊन लोकांचें मन ह्या विषयाकडे वळविल्यास देशाचे मोठें कल्याण होईल.

वाशीप जिल्ह्यांतील
'एक'

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER
25 1901

We have to face the gradual downfall of the agricultural population of the province. The evil is in our midst and we realize from time to time the process of decay that kills all vitality in our people. Berar is purely an agricultural province and we cannot, without emotion, look at the decline of the general masses. Their welfare is of the greatest importance to the state. In their contentment and prosperity lies the greatest foundation for the glory and stability of the British rule. The soil is rich and fertile and the crops also yield a large revenue. But with all these signs of wealth and prosperity we cannot help confessing to the growing poverty, the loss of vitality and the utter break—down of the staying—power of the people. Poverty is increasing to an alarming extent. People are helpless and fall an easy prey to the two famines in the course of 3 years. This inability of the people was miserably apparent when thousands of men overcrowded the famine—relief camps.

Two great evils are at work and their accumulative effect is the low state to which people have come in the downward march of poverty and the miseries attending thereon. The first cause is excessive rent of the land and the second cause of ruin is the high rate of interest. Both these causes have combined together to make the people worse and worse in their material condition. The Government assert with authority that their assessments are fair and moderate. People are opposed to this opinion. But the contrary view of the people is of no avail when the Government realize their rental through the machinery of their revenue authorities. The people might complain to the Government about the exacting and oppressive nature of the land-tax. We have little hopes of getting any relief in this direction. In addition to the heavy land—tax there is the growing evil of the middle man's sweet pleasure. The middle man intervenes between the Government and the actual cultivator of the land. He is the holder of land from the Government and sub—lets the land to the agriculturists at rack—rent. The Government do not share in the losses of a bad season. Their rent is realized irrespective of the nature and extent of the crops. The middle man is another Government to the actual cultivator. He does not participate in the actual gains or losses of the actual cultivator. Those who are formed by the force of immemorial habits to work in agriculture have increased in large numbers. They will have no employment if they do not go to the class of the middle men. The middle men are the capitalists of the province. They have invested money in land and expect a regular income upon their investments. They have no concern with the goodness or otherwise of each year's season. They sub let the land as if by a regular auction. There are hundreds of bidders who know field-work alone and have no other source of maintaining themselves. A sort of speculation is set in motion. People bid any sums as net income at the end of each agricultural year. The middle man looks to his prospect of getting the best of offers. The rack-rent is then the gain of the middle man and is thus the loss of our agricultural people. The British administration has brought into prominent existence a large class of these middle men. This class means an imperceptible destruction of the original number of small holders of land. We wish to point out to the evil of rack rent as the cause of our people's ruin. The actual cultivators fail to pay off the rack rent, fall in debts and lose finally in this trade of agriculture the estate they had inherited from their elders. This is in short the process in which the masses dwindle into the life of serfs and labourers in agriculture. We think that there should be some sort of legislation to stop the present rack-rents of the middle-men. This is only possible if the system of letting land at a fixed sum of money be discontinued. The middle man and his sub-lessee should both be actual participators in the gains and losses of agriculture. There will then be an inducement to the the middle-man to invest more capital in land and to realize better crops therefrom. It will save the cultivator from the evils of speculation that are rife at present. We hope that the Government will face the present danger with a strong hand and stop the system of rack-rent as early as possible.

## वऱ्हाड

हवामान—थंडीचें मान वाढलें आहे. हवा निरोगी आहे. किरकोळ दुःखणीं वाढलीं होतीं पण तीं मंदावलीं आहेत. सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे पिकें रुपयांतली १२ आणे आलीं आहेत.

मि० आर. ए. सिम्पसन हे विलायतेहून रजेवरून परत येऊन यवतमाळच्या डिपुटी कमिशनरच्या जागीं रुजूं झाले.

यवतमाळचे आफि० डिपुटी कमिशनर मि० मारीस हे मुंबईत स्पेशल ड्यूटीवर जाणार आहेत असें प्रमोदसिंधुकर्ते कळवितात.

फारेस्ट खात्याचे कानसरव्हेटर मि. बागशा हे गेल्या बुधवारीं पेनशन घेऊन विलायतेस गेले. हे जुने अधिकारी असून अंतःकरणाचे मोठें उदार होते. गरिबांविषयीं कनवाळूपणा यांच्या मनांत सदा जागृत असे. याच्या सन्मानार्थ उमरावतीस शेट श्री नारायण रामविलास यांनीं गेल्या सोमवारी पानसुपारीचा समारंभ केला होता. ईश्वर त्यांस दीर्घायु करून सुखी व आनंदी ठेवो!

उमरावतीच्या खानगी हायस्कुलाचा वक्षीस समारंभ गेल्या सोमवारीं झाला. मे. इलियट साहेब अध्यक्षस्थानीं होते. सन १८९९ पासून आजपर्यंतची स्थिती पाहतां असें सिद्ध होतें कीं या विद्यामंदिराची उत्तरोत्तर अभिवृद्धी होत आहे. ही गोष्ट त्या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळीला फारच श्रेयस्कर आहे. शालागृहासाठीं जागा देण्यासंबंधानें मे. इलियट साहेबांनीं अभिवचन दिलें आहे हें ऐकून परम संतोष वाटतो.

मे. क्याटन साहेब जुडिशिअल कमिशनर हे वाशिमच्या कचेऱ्या तपासून बुलढाण्यास येथून रवाना झाले.

रा. रा. त्रिंबक गणेश परांजपे एक्स्ट्रा असि. कमिशनर वाशिम यांस यवतमाळास बदललें आहे.

हितेच्छु— पत्रव्यवहार पोचला. पुढील अंकीं विचार करूं.

*WANTED*

A Cashier on Rs. 25 per month with testimonials of good moral character and fitness for the work: The candidate must have passed at least the Matriculation Examination.

23rd November 1901

N. K. Date
Secretary
Municipal Committee
Akola.

कि. दिवाणी दावा नंबर ५/०१ क्लास १९

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्याबद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान दांडेकर साहेब बहादूर सिव्हील जडज्य जिल्हा आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार वालंबी मर्द बापूजी व भिवसन वल्लद चिंतामण देवे राहणार हातोळे तालुके आकोले.

सर्व लोकांस या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानीं मयत व पूजी वल्लद भवाणी हातोळेकर यांचे लोकाकडे येणें आहे ती रकम रुपये १५६४८७ हें कर्ज वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख १८ माहे आक्टोबर सन १९०१ इसवी रोजीं अर्ज केला आहे व त्या अर्जाचे चौकशीची तारीख ७ माहे दिसेंबर सन १९०१ इसवी रोजीं मुक्रर केली आहे तर सदहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझें सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख २१ माहे ११ सन १९०१

V. N. Dandekar
Civil Judge
Akola.

## नोटीस

किसन वल्लद सोनाजी धोबी राहणार मौजे मानकी तालुके बाळापूर जिल्हे आकोले पोस्ट बाळापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुह्मी मला वागविण्याचे परंतु तुह्मी सात वर्षांपासून वागवीत नाहीं. माझे बापानीं दोन तीन वेळां मला तुमचे येथें आणून घातले परंतु तुह्मी मला बापाच्या घरीं बरेच वेळां पोहचवून दिले बापाच्या येथें मी किती दिवस घालवावे? मी आपले येथें येण्यास तयार आहे असे असूनही आपण आपले घरी नेत नाहीं व बापानें आणून घातले असतां आपण मला वागवीत ही नाहीं आणि हाकलून लावता, मी किती दिवस असे राहावें? करितां या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून १५ पंधरा दिवसाचे आंत मला घेऊन जावे अगर तसे न कराल तर हीच नोटीस फारकती समजून दुसरा गंधर्व करीन मग मजवर तुमचा नवरेपणाचा कोणचाही हक्क राहणार नाहीं. शिवाय लग्नाला लागलेला खर्च व आजपावेतों सात वर्षांचे झालेला खावटीचा खर्च हा सर्व दिवाणी कोर्टांत फिर्याद करून तुमचे पासून भरून घेतला जाईल कळावें तारीख २४ नोव्हेंबर सन १९०१ इसवी.

सही

भुली मर्द किसन धोबीन हल्लीं मुक्काम बाळापूर निशाणी खुद बांगडी.

दस्तुर यशवंत अमृत राहणार बाळापूर

विलक्षण चौकशी—वायव्यप्रांतांत एक विलक्षण चौकशी चालू आहे. तेथील लोकवस्तीला किती अन्न लागतें, व कोणत्या जातींचें लागतें याविषयीं सविस्तर माहिती गोळा करण्यासाठीं डे. कलेक्टरास हुकूम दिला आहे. प्रांतांतील निरनिराळ्या भागांतील, निरनिराळ्या जातीतील लोकांत लहान मुलांचें आंगावरील दूध केव्हां तोडतात. तरुण स्त्री पुरुषास वयाच्या कोणत्या वर्षी पुऱ्या अन्नाची जरूर लागते व पुरें भोजन ह्मणजे केवढें अन्न. वयाच्या कोणत्या वर्षी भुकेचें मान कमी होऊं लागते व गहूं, डाळ किंवा तांदूळ यांचें प्रमाण कितपत कमी होतें. धान्या ऐवजीं दुसरे कोणते पदार्थ अन्नाप्रमाणें खाण्यांत येतात इत्यादि मुद्याविषयीं माहिती गोळा करण्याचें ठरलें आहे. ही माहिती पिळवून पुढें काय करावयाचें आहे बरें ?

बोलकें घड्याळ.—हें घड्याळ एका आस्ट्रियन कारागिरानें तयार केलें असून त्याच्या रचनेंत घड्याळ व फोनोग्राफ याचा संयोग झालेला आहे, या घड्याळांत ठोके पडण्याची जेथें व्यवस्था केली असते तेथें एक फोनोग्राफ ठेवला असून वाटेल तें वाक्य त्यास बोलता येतें. विसराळू व निष्काळजी स्वभावाच्या लोकांस या घड्याळाचा फार उपयोग होईल. नियमितपणानें किल्ली दिल्यास हें घड्याळ मालकास निरनिराळ्या गोष्टींची वाटेल तितकेदां आठवण देण्याचें काम फार चोख करतें.

चमत्कारिक अपघात—येवले येथें पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळें सर्व जलाशयावर अहोरात्र महोध्वनी चाललेला असतो. व त्यासाठीं शहरवासी नरनारी जन अविश्रांत श्रम करितात एक बाई आपला आठ महिन्याचा मुलगा झोळींत निजवून त्यास पहाटच्या थंडीनें अपाय होऊं नये ह्मणून खालीं शेगडी ठेवून मागच्या रात्रीं जलयात्रेस निघून गेली. पश्चात झोळीनें पेट घेतला. त्यामुळें तें अर्भक पूर्ण अर्धांग भाजून मातोश्रीच्या शेवटच्या दर्शनाची लालसा ठेवून डोळयानें पहात होतें. शेवटचें दर्शन झाल्यावर त्या सुकुमार बाळानें अखेरीस राम ह्मटला.

स्तुत्य कृत्य—श्री० सयाजीराव महाराज यांनीं गेल्या दुष्काळांत सांपडलेल्या अनाथ मुलांकरितां एक बोर्डिंग हाऊस काढण्यासाठीं ६४ हजार रुपयांची मंजुरी दिली.

ली हंग चंग यांचा मृत्यु— हा मोठा धोरणी व मुत्सद्दी पुरुष होता. चीनच्या मागासलेल्या व खालावलेल्या राष्ट्राचा तो मोठा आधार स्तंभ होता. आपलें राष्ट्र सुधरावें व त्यांत दुसऱ्याचें बोट शिरकूं नये यासाठीं तो अगदीं डोळयांत तेल घालून जागत होता. चीनच्या भोंवतीं इतर राष्ट्रांनीं जो नुकताच वणवा पेटवून दिला होता त्यांतून चीनास भाजलेला पोळलेलाच पण जिवंत तरी बाहेर ओढून काढण्याचें श्रेय ह्यांसच आहे. ली हंग सारख्या कार्यकर्त्यां, दूरदर्शी व देशाभिमानी पुरुषाच्या अमृततुल्य अनुभवाचा लाभ घेण्याची सुवेला चिनास प्राप्त झाली नाहीं हें खरोखरी त्याचें दुर्दैव होय. ह्या आपत्कालीं चिनास धीर देऊन त्रास पडूं न देण्याची हिंमत बांधणारा शूर वीर कोण उभा राहील तो खरा.

लक्ष्मीचें अनिवार प्रेम— अमेरिका ह्मणजे लक्ष्मीचें प्रिय माहेर घर व आवडतें विहार मंदीर होय. ती ह्या ठिकाणीं इतकी रमून गेली आहे कीं, असंख्य भक्तजन तिच्या नुसत्या दृष्टिप्रसादाच्या आशेनें रात्रंदिन तिचा धावा करीत आहेत पण त्यांच्या कडे ती मुळींच पाहत नाहीं, इतकेंच नव्हे पण ती ज्यांच्या जवळ वास करीत आहे, त्यांना तिचा कंटाळा आला आहे, तरी दुसरीकडे तिचा पाय निघत नाहीं, कोण हें प्रेम ! अमेरिकेच्या खजिन्यांतील पैसा सर्व खजिना भरून जाऊन, वरून वाहूं लागला आहे त्याच्या प्रतिबंधार्थ १६ लक्ष डालर खर्च करण्याचा त्या सरकारचा विचार आहे. उद्योगरूपी भक्तिमंत्रानेंच लक्ष्मी पूर्ण वश होते, ह्मणून ह्याच मंत्राचा जयघोष तिच्या प्राप्तीसाठीं करावा, ह्मणजे मग ती आपल्यास सोडून कधींहि ढकलून दिली तरी जाणार नाहीं.

शोचनीय मृत्यु—पुण्याचे प्रसिद्ध रा.ब. अण्णासाहेब भिडे यांस गेल्या सोमवारीं रात्रौ जिना चढतांना पाय चुकल्याचें निमित्त होऊन आकस्मिक मृत्यू आला. यांचे वय पाऊणशें वर्षांचें होतें. हे सार्वजनिक कार्यांत नेहमीं पुढाकार घेत असत. हे मोठे राजमान्य व लोकमान्य गृहस्थ असून सत्वस्थ व दिलदार होते. यानीं गेल्या ६० वर्षांच्या सर्व घडामोडी स्वतां डोळ्यांनीं पाहिलेल्या होत्या. या काळांत जे थोर व नामांकित लोक उदयास आले त्यांचा व यांचा चांगला स्नेहभाव असे. यांच्या तोडीचा अनुभवी मनुष्य त्या काळच्या याच्या बरोबरीच्या गृहस्थांतून एखादाच उरला होता. वृद्धापकाळीं क्लेश कष्ट न होतां यांचें देहावसान झालें ही दुःखांत सुखाची गोष्ट होय. अशी मृत्यूची भेट पुण्यवान् पुरुषांसच प्राप्त होत असते.

चमत्कारिक कोडें—सर मिचेल साहेबांना एक गूढ कोडें पडलें होतें. तें उकलून सांगणारा कोणी गुरु भेटेल या आशेनें त्यांनीं शोध चालविला होता. शेवटीं नुकतेच काबूलच्या तक्तावर आरूढ झालेले हबिबुल्ला ह्याच गुरूंच्या पायाचा लाभ त्यास मिळाला. लागलीच त्यांनीं आपली शंका त्यांच्या पुढें मांडून प्रश्न केला कीं, महाराज, मी असें ऐकिलें कीं, आपण आपलें सेनाबल वाढवणार आहांत व त्याच्याच बरोबर लोकांवरील करहि कमी करणार आहांत. या परस्पर विरुद्ध गोष्टी आपण एक समयावच्छेदें करून कशा साध्य करणार हें जाणण्याची माझी फार उत्कंठा आहे. माझी शंका निवृत्ति करण्यास आपण समर्थ आहा ! हा कूट प्रश्न कसा सुटला जातो याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

ईस्ट अँड वेस्ट— या नांवाचें मासिक पुस्तक मुंबईत निघूं लागलें आहे. याचें संपादक मि० बहिरामजी एम. मलबारी हे आहेत इतकेंच सांगितलें ह्मणजे हें पुस्तक उत्तमच तऱ्हेनें चालेल असें निराळें आश्वासन देण्याची जरूर नाहीं. यांत अनेक नामांकित लेखकांचे लेख येणार आहेत. इंग्लंडांतील 'नाइनटीन्थ सेंचरी' किंवा 'रिव्हू आफ् रिव्हू' सारख्या अग्रगण्य व नांवाजलेल्या मासिकांच्या तोडीचें हें होईल अशीं सर्वांस उमेद आहे. ह्या प्रयत्नानें ईस्ट अँड् वेस्ट ह्मणजे पूर्व व पश्चिम. या दोघांचें संमेलन करण्याचा मुख्य हेतु होय. पूर्व पश्चिम या दोन दिशा कधीं कालींहि एकमेकांस भेटणार नाहींत असें ह्मणतात पण मलबारी साहेबांच्या प्रयत्नानें ह्या दोघीहि सप्रेम एकमेकांच्या गळयांत गळा घालतील असा पूर्ण भरंवसा आहे.

## ट्रान्सवाल समरांगण

ट्रान्सवालच्या समरभूमीवर जें रणकुंड पेटलें आहे त्याच्या तेजःपुंज ज्वाला अद्याप स्वैर रीतीनें आपलें साम्राज्य करीत आहेत. त्यास कोणाचा प्रतिकार झाला तर त्या अग्निशलाका रागानें व त्वेषानें लाल होऊन शत्रूंस भाजून काढीत आहेत. ह्या नरयज्ञास कोणच्या मुहूर्तावर प्रारंभ झाला असेल तो असो. हा अग्नि नारायण किती रक्त प्राशन केल्यावर शांत होणार आहे. कांहीं समजत नाहीं!

उत्तरोत्तर बोअर लोकांच्या धैर्योदधीस जोरा जोरानें भरतीच येत आहे. त्यांस मृत्यूची दरकार वाटत नाहीं, पण अपकीर्ति, मान खंडणा व स्वातंत्र्यापकर्ष या गोष्टि त्यांच्या वज्रासारख्या कठोर अंतःकरणासहि फार झोंबतात व त्यांस विव्हल करून सोडतात. एखाद्या महा भुजंगाच्या फणास धक्का लावावा किंवा एखाद्या वाघिणीच्या बचड्यास कोणी हात लावावा ह्मणजे तो भुजंग किंवा ती वाघीण जशी फोंफावत व दांत ओठ खाऊन त्वेषानें नरडी फोडण्यास धांव मारते तद्वत बोअर लोक चवताळून गेले आहेत. जसा मोठा भयंकर सिंह पिंजऱ्यांत कोंडला असला तरी आपल्या गर्जनेनें सर्व प्रांत दणाणून व भयभीत करून सोडतो त्या प्रमाणें इंग्रजांच्या अफाट सेनाबलाच्या पिंजऱ्यांत बोअर लोक सापडले आहेत. तरी हा पिंजरा फोडून बाहेर उडी घालण्यास जेव्हां ते धांवतात तेव्हां इंग्रजांचीं शस्त्रें भयानें खालींच पडतात कीं काय असा भास होतो. कितीहि झालें तरी वाघ तो वाघच यांत संदेह नाहीं. त्यांस कितीहि कष्टदशा प्राप्त झाली तरी तो तृण खाऊन जीव ठेवणार नव्हे.

बोअर लोकांनीं जी लढाईस कंबर बांधलीं ती दुसऱ्याच्या आशेवर बांधली नसून स्वतांच्या मनगटाच्या जोरावर बांधली आहे. त्यांचा सर्व भरंवसा त्या एका परमेश्वरावर आहे. त्यांचा स्वातंत्र्य वृक्ष तोडून टाकण्यास ज्यांनीं शस्त्र घेतलें किंवा तो जाळून टाकण्यास ज्यांनीं अग्नि घेतला त्यांचें निर्दालन करून आत्म संरक्षण करण्याचा मार्ग ते कसा सोडतील. शिवाय ज्यांनीं स्वातंत्र्याच्या साठीं आपली सोन्या सारखीं माणसें गमावलीं ते तें स्वातंत्र्य मिळविल्या खेरीज कदापिहि स्वस्थ राहणार नाहींत.

---

### नोटीस

बेशमी रुखाई मर्दे रामजी जात माळी राहणार देगांव तालुके बाळापूर यासः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस टपाल मार्फत आलेली पावली. मयत रामाजी याचा मी मुलगा आहे त्यास दुसरा मुलगा नाहीं. वडिलोपार्जित इस्टेट आहे त्याची वाटणी झाली नसून ती एक जागीं आजपर्यंत मी वाहिली आहे. तुझा फक्त अन्नवस्त्राचा हक्क आहे. या प्रमाणें तू माझे घरीं येऊन रहावे. तूं दुसऱ्याचे नादी लागून इस्टेट अफरातफर करण्याचे इराद्यानें मजला भिती दाखविण्यासाठीं नोटीस दिली आहेस तशा रितीनें मी भिणारा मनुष्य नाहीं. सदर्हू जिनगी हल्लीं मुद्दां माझेच ताब्यांत असून मीच वाहत आहे. या उपर तुला जे कायदेशीर करणें असेल ते करावे. डागडागीनें दुसरे लोकाचे मदतीनें तू जिनगीचा कबजा घेण्यास आलीस तर तुजवर फौजदारी करीन तुजजवळ डागडागीनें आहेत त्याची तू अफरातफर करीत आहेस असे मजला कळते करितां ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसाचे आंत माझे येथें डागिन्यासह येऊन रहावें कळावें तारीख २१।११।१९०१ इ०

सही

संभु वल्लद रामाजी माळी राहणार

देगाव निशाणी खुद्द हातची.

---

### जाहीरनामा

या नोटिशिवरून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं सदर्हू माझी सापत्न माता रुखाई मर्दे रामजी माळी राहणार देगांव इचे पासून कोणीही माझी इस्टेट गहाण अगर खरेदी घेऊ नये घेतल्यास ज्याचा तो जबाबदार राहील. कळावें. ता.२१।११।०१

सही

संभु वल्लद रामाजी माळी राहणार

देगांव निशाणी खुद्द हातची.

---

### नोटीस

बेशमी दावल वल्लद उकर्डा तेली वस्ती पातुर शेखबाबू हल्लीं राहणार फत्तेखेलडा उर्फ साकर खेरडे तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा यांस.:—

मी खाली सही करणारीण या नोटिशीनें कळविते कीं माझ्या अज्ञानपणांतच माझें लग्न तुह्मा बरोबर लागलें. गेल्या दहा वर्षा पासून तुह्मी मला सोडून दिलें आहे. तुह्मी मजूरी कधींबधीं करितां पण तुमची मजूरी तुह्मालाच खाण्याला पुरत नाहीं अशी तुमची वागणूक आहे. तुह्मी मला न कळत सोडून चालते झाला. माझ्या अन्नवस्त्राची तुह्मी कांहींच तजवीज केली नाहीं. मी दोन चार वेळा तुह्माकडे आले पण तुह्मी ह्मणतां कीं तुला मी पोसत नाहीं. तुमच्या या दुष्टाव्यानें माझा जन्म व्यर्थ चालला आहे. पातुरच्या पचांनीं तुह्मास समजाविलें असून तुह्मी आपला गैर मार्ग सोडत नाहीं. ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत तुह्मी मला घेऊन जावें. तुमच्या नांवावर काढलेलें सावकाराचें कर्ज फेडावें आणि चार पंचांच्या ह्मणण्या प्रमाणें माझ्याशी संसार करावा. असें करण्यास चुकल्यास तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर नाहीं कळावें. तारीख २२ नोवेंबर १९०१.

सही

बजी मर्दे दावल तेली राहणार

अलेगांव निशाणी बांगडी.

---

( पुरवणी पहा )